रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ११७
www.ramprahar.com

बुधवार, १३ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या खारघरमध्ये | महायुती उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य सभा



**पनवेल** : रायगड, ठाणे शहर, नवी मुंबईतील महायुती उमेदवारांच्या प्रचारार्थ गुरुवारी (दि. १४) दुपारी ३ वाजता खारघर येथे देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भव्य जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. सेक्टर २९मधील सेंट्रल पार्कजवळील मैदानात ही सभा होणार आहे. या सभेसाठी ५० हजार लोक उपस्थित राहण्याची शक्यता असल्याने भव्य व्यासपीठ उभारण्यात आले आहे. त्याचबरोबर या सभेच्या तयारीबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून प्रत्यक्ष ठिकाणी पाहणी करून आढावा घेतला जात आहे. खारघर येथील पेठपाडा मेट्रो रेल्वेस्थानकाच्या बाजूला असलेल्या मैदानात हेलिपॅड उभारण्याचे काम सुरू आहे तसेच या ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. श्वानपथकाद्वारे या जागेची तपासणी करण्यात येत आहे. सभा सुरळीत होण्यासाठी नवी मुंबई पोलिसांकडून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.



# महायुती म्हणजे गती आणि प्रगती; तर महाविकास आघाडी स्थगिती!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पेणमध्ये प्रतिपादन

**पेण : प्रतिनिधी**

आपली जी महायुती आहे ती गती आणि प्रगती आहे; तर महाविकास आघाडी म्हणजे स्थगिती आहे, अशा शब्दांत महायुती आणि महाविकास आघाडीमधील फरक उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. १२) पेण येथे स्पष्ट केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध लोकोपयोगी योजना राबवून राज्यात महायुतीचे सरकार गतिमान पद्धतीने काम करीत आहे. या सरकारला साथ देत महायुतीचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांना निवडून द्या, असे आवाहनही त्यांनी केले.

महायुतीचे उमेदवार रविशेठ पाटील यांच्या प्रचारार्थ पेणमधील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमच्या मैदानावर सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या सभेस सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, खासदार धैर्यशील पाटील, माजी आमदार अनिकेत तटकरे आदी उपस्थित होते.

आपल्या भाषणात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई आणि रायगड जिल्ह्याला जोडणारा अटल सेतू मी तुम्हाला अगोदरच देऊ शकलो असतो, पण अडीच वर्षे नादान लोकांचे राज्य आले. त्यांनी खोडा घालत अटल सेतूची गती कमी केली, परंतु मला आनंद आहे आज पेण आणि मुंबईमधले अंतर काय आहे हे लोकांना समजत नाही. पेणमधून निघून मुंबईपर्यंत सुसाट येता येते, कारण अटल सेतू या ठिकाणी तयार झाला आहे. अटल सेतू हे गती आणि प्रगतीचे चांगले उदाहरण आहे. **(पान २ वर..)**





### महायुती सरकारची कामे जनतेपर्यंत पोहचवा -मंत्री रवींद्र चव्हाण

या वेळी सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले की, मागच्या काळात महायुती सरकारच्या माध्यमातून येथील भागाचा विकासाला गती देण्याचे काम एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागरविकास खाते, आरोग्यसेवा अशा अनेक माध्यमातून करण्यात आले आहे. ही सर्व कामे मतदारांपर्यंत पोहचवा तसेच होऊ घातलेल्या निवडणुकीत कार्यकर्त्यांनी बूथवर जास्तीत जास्त मतदान महायुतीचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांना कसे होईल याची जबाबदारी पार पाडावी.

### दुप्पट मताधिक्क्य मिळवून देऊ -खासदार सुनील तटकरे

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी, माझ्या निवडणुकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा या मैदानावर झाली होती. आजही तो योग आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रचारावेळी जुळून आला असल्याचे नमूद केले. या भागातून रविशेठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप व घटक पक्षांनी मोठे मताधिक्क्य मला मिळवून देण्याचे काम केले असेच काम या निवडणुकीत होऊन माझ्यापेक्षा दुप्पट मताधिक्क्य मिळवून देण्याचे काम सर्व कार्यकर्ते करतील व रविशेठ मोठ्या मताधिक्क्याने निवडून येतील, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

**“ पेणच्या विकासात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासनिधी आणण्याचे काम करण्यात आले. पाणी व इतर प्रश्नही येत्या काळात मार्गी लागतील. यासाठी महायुतीला भरघोस पाठिंबा द्या.**

**–आमदार रविशेठ पाटील, महायुतीचे उमेदवार**



## महाविकास आघाडी म्हणजे भ्रष्टाचाराचे सर्वात मोठे खिलाडी –पंतप्रधान मोदी

**चिमूर : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मंगळवारी (दि. १२) चिमूर येथे सभा झाली. या वेळी त्यांनी महाविकास आघाडीवर टीका केली. ही आघाडी म्हणजे भ्रष्टाचाराचे सर्वात मोठे खिलाडी असल्याचे ते म्हणाले.

पंतप्रधान मोदींनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला चिमूरच्या क्रांतिकारकांना अभिवादन केले. बाबुराव शेडमाके यांच्या स्मृतीलादेखील अभिवादन केले. सभेत आलेल्या गर्दीचा विशेष उल्लेख करून त्यांनी महायुतीने जाहीर केलेल्या भाजपच्या संकल्पपत्राचे कौतुक केले. हे संकल्प महाराष्ट्राच्या विकासाची गॅरंटी आहेत, असे त्यांनी म्हटले.

महाविकास आघाडीने विकास प्रकल्प रखडवणे, वळवणे यात पीएचडी केली आहे. काँग्रेसने दुप्पट पीएचडी केली असून विकासकामांना ब्रेक लावण्यात काँग्रेस तरबेज आहे, असे सांगून पंतप्रधान मोदी म्हणाले की, चंद्रपूरने अनेक वर्षे नक्षलवाद सहन केला, अनेक तरुणांचे बळी गेले. त्यामुळे या भागात उद्योग येऊ शकले नाहीत. आम्ही नक्षलवादाला लगाम लावला. म्हणून या भागात आता उद्योग येत आहेत.

## ४२६ मतदान केंद्रांचे महिला करणार नियंत्रण

**मुंबई** : केंद्रीय निवडणूक आयोगाने महिला नियंत्रित मतदान केंद्र स्थापित करण्याचे आदेश दिले आहेत. या वेळी विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात ४२६ मतदान केंद्रांचे नियंत्रण महिला करणार आहेत. महिलांचा मतदानातील सहभाग वाढविण्यासाठी अशी केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.

महिला नियंत्रित मतदान केंद्रांमध्ये तैनात असलेल्या पोलिसांपासून ते निवडणूक कार्यावर असलेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासह सर्वजण महिला असतील. महिला नियंत्रित मतदान केंद्र स्थापन करण्याच्या निर्णयामुळे महिलांचा मतदानातील सहभाग वाढण्यास मदत होणार आहे.

## निवडक

### चीनमध्ये भरधाव कारने ३५ जणांना चिरडले, ४३ जखमी

**बीजिंग** : चीनमधील झुहाई शहरात एका चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने तब्बल ३५ जणांचा मृत्यू झाला आहे. स्पोर्ट्स सेंटरच्या बाहेर मोठ्या प्रमाणात लोक जमलेले असताना ही घटना घडली. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून कारचालकाला पोलिसांनी अटक केली आहे. हा अपघात होता की यामागे काही वेगळा हेतू होता याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

### अभिनेता शाहरूख खानला धमकी देणाऱ्याला छत्तीसगडमधून अटक

**रायपूर**: गेल्या महिन्यात माजी मंत्री



बाबा सिद्दिकी यांची हत्या झाल्यापासून अभिनेता सलमान खानला सातत्याने जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत. अशात काही दिवसांपूर्वी अभिनेता शाहरूख खानलादेखील ५० लाख रुपयांच्या खंडणीसाठी जीवे मारण्याची धमकी आली होती. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी छत्तीसगडमधून संशयित आरोपीला अटक केली आहे. पोलीस सध्या आरोपीची चौकशी करीत आहेत.

## पनवेलमधील ‘उबाठा’कडूनही शेकाप उमेदवाराविरोधात तक्रार

### बाळाराम पाटील यांच्यावर कारवाईची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या लीना गरड या महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार असताना शेकापचे उमेदवार बाळाराम पाटील आपण महाविकास आघाडीचे उमेदवार असल्याचे भासवत आहेत. हा कार्यकर्त्यांची आणि मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रकार असून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ‘उबाठा’कडून निवडणूक आयोगाकडे पत्राद्वारे करण्यात आली आहे.

पनवेल, उरण आणि पेण विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाली आहे. महाविकास आघाडीतील एक प्रमुख घटक पक्ष असलेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उरणमधून माजी आमदार मनोहर भोईर, पनवेलमधून लीना गरड आणि पेणमधून प्रसाद भोईर निवडणूक लढवत आहेत. दुसरीकडे शेकापने उरणमधून प्रितम म्हात्रे, पनवेलमधून बाळाराम पाटील आणि पेणमधून अतुल म्हात्रे यांना उमेदवारी दिली आहे. शेकापचे उमेदवारही आपण महाविकास आघाडीचे उमेदवार असल्याचा दावा करीत आहेत.

पनवेल मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व महाविकास आघाडीतर्फे लीना गरड या अधिकृत उमेदवार असतानादेखील येथे शेकाप उमेदवार बाळाराम दत्तात्रेय पाटील हे महाविकास आघाडीतील पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांचे फोटो आपल्या प्रचारात वापरून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करीत आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदर्श आचारसंहितेतील परिशिष्ट १ भाग ७ आदेश क्रमांक (५) नुसार हा गंभीर गुन्हा असून त्याद्वारे शेकाप उमेदवार बाळाराम पाटील यांच्यावर मतदारांमध्ये संभ्रम निर्माण केल्याप्रकरणी कारवाई करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित देण्यात यावेत, अशी मागणी शिवसेना उबाठाचे उपसचिव सचिन परसनाईक यांनी राज्य निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे केली आहे. अशीच तक्रार ‘उबाठा’चे उरणमधील उमेदवार मनोहर भोईर यांच्या वतीने शेकापच्या प्रितम म्हात्रेंविरोधात करण्यात आलेली आहे.

## विकासपुरुष आमदार प्रशांत ठाकूर यांना भरघोस मतांनी विजयी करा

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मतदारसंघाचा विकास करणारे आमदार प्रशांत ठाकूर यांना विधानसभा निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी केले आहे.

कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रचारात जोरदार आघाडीत घेतली आहे. महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसोबत ते संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढत आहेत. त्यानुसार ग्रामीण भागातील नेरे, नेरेपाडा, सांगटोली, मालडुंगे ग्रामपंचायतीमधील विविध वाड्या, शिवणसई, तामसई, बोंडारपाडा, दुंदरे, दुंदरेपाडा, रिटघर आणि चिंचवलीमध्ये सोमवारी (दि. ११) प्रचार करण्यात आला. या वेळी ठिकठिकाणी त्यांचे माता-भगिनींनी औक्षण करून स्वागत केले तसेच ज्येष्ठांनीही त्यांना विजयाचा आशीर्वाद दिला.



या प्रचारावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, राज पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, कोप्रोलीचे माजी सरपंच रमेश पाटील, नारायण चौधरी, शांताराम चौधरी, नेरेचे माजी सरपंच वासुदेव गवते, ताई पाटील, माजी सदस्य कल्पना वाघे, चिंध्रण माजी सरपंच एकनाथ पाटील, सदस्य निलेश पाटील, गोटीराम पाटील, राजा भोईर, सुनील शेळके, प्रलय भोपी, युवा मोर्चा तालुका कोषाध्यक्ष अमर शेळके, दयेश जांभळे, विठ्ठल शेळके, तुकाराम म्हसकर, संतोष शेळके, विकास भगत, विनायक भगत, अनंता पाटील, विजय शेळके, अनिल शेळके, नारायण शेळके, करण जांभळे, नामदेव डुकरे, मंगल पाटील, कचरू शेळके, शालिक शेळके, बारक्या शेळके, सुरेश शेळके, चंद्रकांत शेळके, समाधान पाटील, उमेश पाटील, गुरूनाथ भोपी, राजेश भोपी, राजन भगत, शरद भोपी, बाळकृष्ण भोपी, गणेश भोपी, बाळूबुवा भोपी, गुलाब भोपी, विष्णू चौधरी, नकुल चौधरी, विलास खारूटकर, रामदास खारूटकर, डॉ. रोशन पाटील, मिलिंद पाटील, **(पान २ वर..)**

## तुलसी विवाहानंतर सुरू होणार लग्नसराई



**मुंबई : प्रतिनिधी**

वैदिक पंचांगानुसार दरवर्षी कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षाच्या द्वादशीला तुलसी विवाह साजरा केला जातो. यंदा तुलसी विवाह १३ नोव्हेंबरला सुरू होणार असून १५ नोव्हेंबरला कार्तिक पौर्णिमेपर्यंत तुलसी विवाह साजरे केले जातील. त्यानंतर माणसांच्या विवाह सोहळ्यांना सुरुवात होईल, अशी माहिती पंचांगकर्ते दा.कृ.सोमण यांनी दिली.

हिंदू विधींमध्ये विवाह खूप महत्त्वाचा आणि पवित्र विधी मानला जातो. वैदिक शास्त्रानुसार विवाह हे एक अतिशय पवित्र नाते असून ते शुभ मुहूर्तावरच झाले पाहिजे. सर्व शुभकार्यांसाठी मुहूर्त अन् वेळ, तारीख असते. लग्नासाठीही शुभ मुहूर्त आणि तारीख असते. त्यामुळे वैवाहिक जीवन आनंदाने परिपूर्ण करण्यासाठी शुभ वेळ आणि तारीख निश्चित करणे महत्त्वाचे आहे, कारण विवाह म्हणजे एक मिलन आहे, जे दोन व्यक्तींना तसेच दोन कुटुंबांना एकमेकांशी जोडते आणि आयुष्यभराच्या सुंदर नात्यात बांधते.

**मार्च २०२५पर्यंतचे विवाह मुहूर्त**

चालू नोव्हेंबर महिन्यात १७, २२, २३, २५, २६, २७, डिसेंबरमध्ये ३, ५, ६, ७, ११, १२, १४, १५, २०, २३, २४, २६; पुढील वर्षी जानेवारीत १६, १७, १९, २१, २२, २६, फेब्रुवारीत ३, ४, ७, १३, १७, २०, २१, २२, २३, २५ आणि मार्च महिन्यात १, २, ३, ६, ७, १२ व १५.

## कार्तिकी सोहळ्यानिमित्ताने पंढरपूर भाविकांनी फुलले

**पंढरपूर : प्रतिनिधी**

कार्तिकी एकादशी सोहळ्याच्या निमित्ताने पंढरपूर नगरी भाविकांच्या गर्दीने फुलून गेल्याचे दिसून आले. महाराष्ट्रासह इतर राज्यांतून भाविक आल्याने विठ्ठल मंदिर परिसरात वातावरण भक्तिमय बनले.



श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार आणि सायली पुलकुंडवार यांच्या हस्ते झाली तसेच मानाचे वारकरी म्हणून बाबुराव सगर आणि सागरबाई सगर यांना पुजेचा मान मिळाला.

विठूरायाच्या पदस्पर्श दर्शनाची रांग पत्रा शेडपर्यंत लांब गेली. दर्शनासाठी साधारणतः आठ ते नऊ तासांचा कालावधी भाविकांना लागत होता. टाळ, मृदुंग, प्रासादिक विक्रीची दुकाने या ठिकाणी खरेदीसाठी भाविकांची गर्दी झाल्याचे पहावयास मिळाले.

## लोकल चर्चकडून आमदार प्रशांत ठाकूर यांना पाठिंबा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


लोकल चर्च पनवेल (प्रोटेस्टंट) यांच्याकडून भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी आणि मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार तथा लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांना बिनशर्त पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. लोकल चर्चचे चेअरमन एस.ए. श्रींगारे यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे हे पाठिंबापत्र मंगळवारी (दि. १२) सुपूर्द केले.



या पाठिंबापत्रात म्हटले आहे की, नवीन पनवेल व आसपासच्या परिसरात मराठी ख्रिस्ती बांधव वास्तव्यास आहेत. आजपर्यंत लोकल चर्च पनवेलच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांना आम्ही पाठिंबा दिलेला आहे. या वेळीही २०२४च्या विधानसभा निवडणुकीसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांना बिनशर्त पाठिंबा देत असून ते प्रचंड मतांनी विजयी होतील, असा विश्वासही त्यांनी या समर्थन पत्रातून व्यक्त केला आहे.

# ‘मविआ’त मुख्यमंत्रिपदावरून कुस्ती

## सोलापुरात पीएम मोदींची विरोधकांवर टोलेबाजी



**सोलापूर : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीत मुख्यमंत्रिपदावरून कुस्ती चालू आहे. आघाडीतील एक पक्ष पूर्ण दिवस मुख्यमंत्रिपदावरील दावेदारी करण्यात व्यस्त असतो, असा टोला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ठाकरे गटाला मारला. पंतप्रधान मोदी मंगळवारी (दि.१२) सोलापुरातील सभेत विरोधकांवर टोलेबाजी केली.

पंतप्रधान नरेंद्री मोदींनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठीतून केली. या वेळी त्यांनी पंढरीच्या विठ्ठलाला नमन केले. ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राला स्थिर सरकारची गरज आहे. महाविकास आघाडी ही तीन चाकांची गाडी असून ते अस्थिर आहेत. त्यांच्यात मुख्यमंत्रिपदावरून चढाओढ लागलीये. निवडणुकीच्या आधीपासून त्यांच्यात कुस्ती चालू आहे. निवडणुकीनंतर मविआत काय होईल? असा टोलादेखील पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विरोधकांना लगावला.

सोलापूरचे लोक ज्या विकासाची मागणी करीत होते, त्याची पूर्ती महायुती सरकारने पूर्ण केली आहेत. काही दिवसांपूर्वी सोलापूर विमानतळाच्या विस्ताराचे उद्घाटन आपण केल्याचेही पंतप्रधान मोदींनी सांगितले. देशात जितके पंतप्रधान झाले असतील त्यातून मीच असेन की, जो सर्वांत जास्त वेळा सोलापुरात आलो असेल. सोलापूरकरांनी मला मोठे प्रेम दिले. सोलापुराकरांचे प्रेम मला ऊर्जा देत असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. सोलापूरच्या फोर लेन हायवे चहूबाजूला झाले आहेत, सोलापूरपासून वंदे भारत चालू झाली. हे बदल केंद्रातील भाजप आणि राज्यातील महायुतीच्या कामामुळे झाले आहेत. आज आपण विकसित महाराष्ट्रापासून विकसित भारताकडे जात आहोत. भाजप युती आहे, तर गती आहे, महाराष्ट्राची प्रगती असल्याचा नारा पंतप्रधान मोदींनी दिला. महाराष्ट्राला पुढील पाच वर्षांपर्यंत महायुतीचे सरकार लागेल जे स्थिर असेल. जी महाराष्ट्रासाठी दूरगामी धोरणे तयार करेल, परंतु महाविकास आघाडीचे सरकार आहे ते तीन चाकांची गाडीवर आहे. या गाडीला ना ब्रेक आहे स्टअेरिंग आहे. ही गाडी कोण चालवेल? यासाठी त्या तिन्ही पक्षांमध्ये मारामारी चालू असल्याची टीका पंतप्रधान मोदींनी केली.

# रत्नागिरी कालरकोंडवाडीमधून १३ बांगलादेशी घुसखोर ताब्यात

## दहशतवादविरोधी पथकाची मोठी कारवाई

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील नाखरे ग्रामपंचायत हद्दीतील कालरकोंडवाडी येथील चिरेखाणीवर अवैधरित्या वास्तव्य करणाऱ्या १३ बांगलादेशी घुसखोरांना दहशतवादविरोधी पथकाने मंगळवारी (दि.१२) पहाटे ३.३० वा.च्या सुमारास अटक केली. ही घटना रत्नागिरी तालुक्यातील नाखरे-कालरकोंडवाडी येथे घडली.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वहिद रियाज सरदार (वय ३४), रिजाउल हुसेन करीकर (वय ५०), शरिफूल हौजीआर सरदार (वय २८), फारुख महंमद जहीरअली मुल्ला (वय ५०), हमिद मुस्तफा मुल्ला (वय ४५), राजु अहमद हजरतली शेख (वय ३१), बाकिबिल्लाह अमीर हुसेन सरदार (वय ३९), सैदूर रेहमान मोबारक अली (वय ३४) आलमगिर हूसेन हिरा सन ऑफ अब्दुल कादर दलाल (वय ३४), मोहम्मद शाहेन सरदार सन ऑफ समद सरदार (वय ३२), मोहम्मद नुरुझमान मोरोल सन ऑफ बलायत अली (वय ३८), मोहम्मद नुरहसन सरदार सन ऑफ मोहम्मद जहर सरदार (वय ४५) आणि मोहम्मद लालूट मोंडल सन ऑफ किताब अली (वय ३७, सर्व रा. ढाका, बांग्लादेश) अशी अटक करण्यात आलेल्या १३ जणांची नावे आहेत.

त्यांच्या विरोधात दहशतवादविरोधी शाखेचे पोलीस नाईक रत्नकांत शिंदे यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार, संशयित १३ बांगलादेशी घुसखोर जून २०२४पासून आतापर्यंत वैध कागदपत्रांशिवाय तसेच भारत-बांग्लादेश सिमेवरील मुलखी अधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीशिवाय भारतात अवैधरित्या प्रवेश करून आसिफ सावकार (रा. पावस बाजारपेठ, रत्नागिरी) याच्या नाखरे ग्रामपंचायत हद्दीतील कालरकोंडवाडी येथील चिरेखाणीवर वास्तव्य करताना आढळून आले.

त्यांच्याविरोधात पारपत्र भारतात प्रवेश नियम १९५० चा नियमासह ६, परकिय नागरिक आदेश १९४८ परि. ३(१) (अ), परकिय नागरिक कायदा १९४६ चे कलम १४प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# ठाण्यात २०.७५ लाखांचा दारूसाठा नष्ट

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई





**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विविध पथकांनी ठाणे जिल्ह्यात अंजूरगाव आणि आलीमघर खाडीमध्ये हातभट्टीवर सोमवारी (दि.११) धाडसत्र मोहीम राबवून एकूण सात गुन्हे नोंदविले आहे. या कारवाईत ३५४ ड्रम्स, १००० लीटर क्षमतेचे तीन बॉयलर व अन्य हातभट्टी साहित्याचा मुद्देमाल जप्त केला. हा माल नाशवंत असल्यामुळे जागेवरच नष्ट करण्यात आला असून या मुद्देमालाची किंमत २० लाख ७५ हजार आहे.

या गुन्ह्यातील आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अन्वये सात गुन्हे नोंदविण्यात आले आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता काळात आदर्श आचारसंहितेचे पालन करून हातभट्टी दारू, अवैध मद्य निर्मिती केंद्रांवर राज्य उत्पादन शुल्क विभाग धाडसत्र राबवित आहे.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक प्रसाद सुर्वे, कोकण विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार यांनी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने ही कारवाई पार पडली आहे. या कारवाईमध्ये ठाणे उपअधीक्षक वैभव वैद्य, दुय्यम निरीक्षक टी. सी. चव्हाण, आबा बोडरे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक एच.एम देवकाते, रणजीत आडे, ए. एम. कापडे, जवान संदीप धुमाळ, अविनाश जाधव, रामचंद्र पाटील, राजू राठोड, भाऊसाहेब कराड, नारायण जानकर, विनोद अहिरे, प्रवीण धवणे, रूपेश खेमनार, नितीन लोखंडे यांनी सहभाग घेतला, असे कोकण उपआयुक्त प्रदीप पवार यांनी कळविले आहे.

# सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरणावर निर्बंध

**रायगड** : विधानसभा निवडणुकीच्या कालावधीत शासकीय, निमशासकीय सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपीकरण करण्यास निवडणूक होईपर्यंत २५ नोव्हेंबरपर्यंत जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी निर्बंध आदेश जारी केला आहे.

निवडणूक कालावधीत काही व्यक्ती, संस्थांकडून मोठ्या प्रमाणात अनधिकृत होर्डींग, बॅनर्स, पोस्टर्स व भिंतीवर जाहिराती लावून विद्रुपीकरण करण्यात येत आहे, तसेच शासकीय तसेच खासगी मालमत्तांचे विद्रुपीकरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. निवडणुकीच्या कालावधीत होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व भिंतीवर जाहीरात प्रदर्शित करताना स्थानिक प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे एकतर्फी आदेश काढण्यात आला असून ध्वनीक्षेपकावर पोलीस विभागाने निर्बंध करावे, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# गतिमंद मुलीवर बलात्कारप्रकरणी आरोपीला १० वर्षांचा कारावास

**अलिबाग : प्रतिनिधी**

गतिमंद मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी आरोपी रमेश रघुनाथ मोकल यास जिल्हा सत्र न्यायालयाने १० वर्षांच्या सश्रम कारावासायची शिक्षा ठोठावली असल्याची माहिती शासकीय अभियोक्ता स्मिता धुमाळ-पाटील यांनी दिली.

पेण तालुक्यातील मळेघर, ॲरॉसिटी रोड येथे २३ जून २०२२ रोजी पीडित गतिमंद मुलीवर बलात्कार झाल्याची घटना घडली. पीडित मुलगी ही या खटल्यातील फिर्यादीची बहीण आहे. फिर्यादीच्या घराशेजारी राहणारा रमेश मोकल तिचा सख्खा दिर आहे. आरोपीने पीडित मुलगी घरात एकटीच असल्याचा आणि तिच्या गतिमंदपणाचा गैरफायदा घेऊन फिर्यादीच्या घराच्या खिडकीतून आत प्रवेश केला आणि तिच्यावर बलात्कार केल्याचा आरोप करण्यात आला होता.

याविरोधात फिर्यादीने पेण पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात तक्रार नोंदविली होती. याप्रकरणी रितसर गुन्हा दाखल झाला होता. उपविभागीय पोलीस अधिकारी संजय शुल्का आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जलदगतीने तपास पूर्ण करून दोषारोप पत्र जिल्हा न्यायालयात दाखल केले.

या खटल्यात विशेष शासकीय अभियोक्ता स्मिता धुमाळ-पाटील यांनी १६ साक्षीदार तपासले. यामध्ये फिर्यादी, पीडित मुलगी, वैद्यकीय अधिकारी डॉ. अर्चना सिंग, डॉ. कोमल शर्मा, तसेच विशेष शिक्षिका नैनीता पाटील, तपासिक अंमलदार संजय शुल्का यांची साक्ष महत्त्वाची ठरली. आरोपीविरोधात सर्व साक्षी, पुरावे सिद्ध झाले. खटल्यात हवालदार सचिन खैरनार, पैरवी कर्मचारी शिपाई प्रियांका नागावकर यांचे सहकार्य मोलाचे ठरले.

# रोहा शहरात राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रचार



**रोहे : प्रतिनिधी**

महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार ना.आदिती तटकरे यांचा प्रचार रोहा शहरात त्यांच्या कार्यकर्त्यांकडून जोरदार सुरू असून प्रमुख विभागात घरोघरी जाऊन पत्रक वाटप करण्यात येत आहे.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातून महायुतीच्या उमेदवार ना.आदिती तटकरे यांचा रोहा शहरातील मोरे आळी, सेवादल आळी, सोनार आळी ब्राह्मण आळी येथे मंगळवारी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जोरदार प्रचार केला. या वेळी महायुतीचे कार्यकर्ते तरुण, विशेषतः महिलांची सहभाग लक्षणीय होती.

माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, महिलाध्यक्षा प्राजक्ता चव्हाण, माजी नगरसेवक महेंद्र गुजर, सुभाष राजे, जितेंद्र पडवळ, नितीन पिंपळे, अजित मोरे, मयूर पायगुडे, निलेश शिर्के, चंद्रकांत पार्टे, तुषार मोरे आदी उपस्थित होते.

# पनवेलपासून रोह्यापर्यंत विस्तारणार तिसरी मुंबई

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मुंबई शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन नवी मुंबईनंतर आता तिसऱ्या मुंबईची निर्मिती सुरू झाली आहे. मुंबईच्या तिप्पट आकाराच्या या तिसऱ्या मुंबईत १७४ गावांचा समावेश असून ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांत विस्तारणार आहे. अत्याधुनिक महामार्ग, मल्टिमॉडेल कॉरिडोर, डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर, आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि कोकणकडे जाणारा सागरी महामार्ग, मुंबई-गोवा एक्स्प्रेस वेला जोडणारे द्रुतगती महामार्गाचे जाळे असणारी ही तिसरी मुंबई असणार आहे.

पनवेल, उरण तालुक्यातील २३ गावांमध्ये सिडको १४ हजार ३२१ कोटी रुपये खर्च करून रस्ते उभारणार आहे. नैना क्षेत्रील २३ गावांचा झपाट्याने विकास व्हावा, यासाठी सिडकोने हा निर्णय घेतला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम प्रगतिपथावर आहे. भविष्यात हा विस्तार रोह्यापर्यंत जाणार आहे.

मुंबई एमएमआर प्रदेशात पालघर आणि रायगड जिल्ह्यांचे मुख्यालय, अलिबाग, पेण, खोपोली, कर्जत हा सर्व विभाग घेण्यात आल्याने तिसर्या मुंबईच्या कार्यक्षेत्रात हा भाग येत आहे. सध्या कर्जत हा हरित तालुका म्हणून ओळखला जातो. मुंबईला दूध पुरवणाऱ्या प्रमुख भागात कर्जतचा समावेश आहे. खोपोली, खालापूरमध्ये बर्याच प्रमाणात औद्योगिक वसाहती आहेत. हा सर्व भाग आता तिसर्या मुंबईत समाविष्ट झाला आहे. तिसरी मुंबई ही थेट मुंबई एक्स्प्रेस वेला जोडली जाणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरणाचा भाग येईल.

नैना क्षेत्रातील १ ते १२ असे सर्वच टीपीएस योजनेतील रस्त्यांचे जाळे उभारणीसाठी मार्गातील सर्व अतिक्रमणे हटविण्यात येणार आहेत. रस्ते बांधताना कुठेही सिग्नल यंत्रणा किंवा चौक येऊ नये, याची खबरदारी घेतली जाणार आहे. त्यामुळे रस्ते सरळ रेषेत असतील आणि ज्या ठिकाणी गरज आहे तिथे उड्डाणपूल किंवा अंडरपास बनवला जाणार आहे. यामुळे चौक आणि सिग्नलविरहित आधुनिक डिझाईनचे रस्ते सिडको तयार करणार आहे.

# साळोख ते साजगाव पायी दिंडी

**कर्जत : प्रतिनिधी**

माऊली चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने साळोख ते साजगाव पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या पायी दिंडीचे हे १७वे वर्ष आहे. स्व. रामचंद्र मालुसरे यांनी या दिंडी सोहळ्याची सुरुवात केली होती.

माऊली चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने दरवर्षी कार्तिक पौर्णिमेला साजगाव येथील श्री विठ्ठल मंदिरात जात असते. यंदा दिंडी चालक एकनाथ मालुसरे यांच्या पुढाकाराने साळोख, बार्णे, सापेले परिसरातील वारकरी सहभागी झाले होते. ही पायी दिंडी साळोखहून निघून बार्णे-आरवंद-इंजीवली-वरई-तिवरेमार्गे कर्जत शहरातील प्रती पंढरपूर-आळंदी येथे येऊन श्री विठ्ठलाचे दर्शन घेऊन धाकटी पंढरी साजगाव येथील श्री विठ्ठल मंदिरात पोहचली.

विणेकरी चंद्रकांत कडू, चोपदार उमेश मालुसरे यांच्यासह दशरथ बुवा मुने, दिलीप ढोले, हरिश्चंद्र पेमारे, रामचंद्र मोडक, परशुराम मोडक, संदीपबुवा विचारे, गणेश पवार, भरत मालुसरे, मंगेश मालुसरे, विकास मालुसरे, भगवान भोसले, गणेश मोरे, मोहन मुने, काशिनाथ पडवळ, रमेश शेडगे, प्रभाकर जाधव, दिलीप ठाकरे, लक्ष्मण मालुसरे, मारुती मोरे, जगदीश मुने, हरिश्चंद्र मुने, रवींद्र ठाकरे, संगीता मालुसरे, पुष्पा मालुसरे, रेश्मा ठाकरे, सारिका कडू, विमल मुने, अस्मिता मोडक, हिरा मुने, हिराबाई भोईर, वंदना मार्के, शशिकला मोकाशी आदी सहभागी झाले होते.



पान १ वरुन

# महायुती म्हणजे गती आणि प्रगती; तर महाविकास आघाडी स्थगिती!

याचप्रमाणे विरार-अलिबाग कॉरिडोअरच्या माध्यमातूनदेखील गती वाढणार आहे. कॉरिडोअर करताना काही प्रश्न आहेत, परंतु काळजी करू नका. आपल्या सरकारने कधीही शेतकऱ्यांची जमीन कवडीमोल भावाने घेतली नाही. पुढेही घेणार नाही. शेतकऱ्यांनी चिंता करण्याची गरज नाही. हे सरकार शेतकऱ्यांसोबत आहे. योग्य दर देऊनच जमीन घेतली जाईल.

आपण कोणत्याही गोष्टीची सुरुवात ही श्री गणेशाने करतो. गणेशाची उपासना आणि आराधना तर पेणशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे पेणच्या मूर्तिकारांनी काळजी करायची गरज नाही. एवढी वर्षे अडचणीत येऊ दिले नाही. पुढेही अडचणीत येऊ देणार नाही. शेवटी महाराष्ट्र नाही, तर पूर्ण जगात पेणच्या मूर्ती आम्हाला श्री गणेशाचे दर्शन घडवतात. गणेशाच्या आशीर्वादाने तुमचे काम चालू राहील हा आमचा निश्चितपणे प्रयत्न असेल तसेच निवडणूक संपल्यावर बाळगंगा धरण प्रकल्पग्रस्तांची सभा मंत्रालयात घेतली जाईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. तामसी बंदर विकास, धरमतर जेट्टी विकास, गेट वे येथून वाहतूक सुरू करण्याचे काम येत्या काळात करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पाच वर्षांपूर्वी याच मैदानामध्ये आमदार रविशेठ पाटील यांच्यासाठी मते मागण्याकरिता आलो होतो. त्या वेळी समोर आमचे मित्र धैर्यशील पाटील होते, परंतु आज मला सर्वाधिक समाधान आहे की, माझे दोन्ही मित्र एका मंचावर आहेत. रविशेठ पाटील आणि धैर्यशील पाटील ही जोडी म्हणजे जसे देशात आणि राज्यात डबल इंजिन आहे तसेच पेणला डबल इंजिन मिळालेले आहे. आमदार आणि खासदार अशा प्रकारचे डबल इंजिन घेऊन आज तुम्ही या ठिकाणी काम करत आहात. मला एका गोष्टीचा आनंद आहे की, सातत्याने या भागाच्या विकासाकरिता आमदार रविशेठ पाटील आणि खासदार धैर्यशील पाटील झटत आहेत. त्यांना विकासनिधी कधीही कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी दिली.

खासदार धैर्यशील पाटील यांनी विरोधकांचा समाचार घेताना काही लोक आता येऊन विकासाच्या बढाया मारत आहेत, पण त्यांनी आधी जनतेसाठी घाम गाळावा, तरच मते मागण्याचा अधिकार असणार आहे. यासाठी त्यांनी २३ तारखेनंतर कामाला लागावे, असा टोला लगावला. पेण हे मुंबईच्या जवळ आले असून अनेक बिल्डर, धनिकांचा डोळा येथील जमिनीवर असणार आहे. तेव्हा भूमिपुत्रांनी संघटित होणे गरजेचे आहे, असे आवाहनही त्यांनी केले.

माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी या निवडणुकीनंतर नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतीमध्येही स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांसाठी नेत्यांनी एकत्रित राहावे, असे आवाहन केले.

भाजप सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, दिनेश खैरे, सीताराम कांबळे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. व्यासपीठावर भाजपचे ज्येष्ठ नेते सतिश धारप, जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, राजेश मपारा, सरचिटणीस मिलिंद पाटील, जि.प.च्या माजी अध्यक्ष ॲड. नीलिमा पाटील, अविनाश म्हात्रे, डी.बी. पाटील, प्रभाकर म्हात्रे, मंगेश दळवी, प्रकाश देसाई, गिरीश तुळपुळे, अनिरूध्द पाटील, उद्धव कुथे आदी उपस्थित होते, तर सभेला कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विकासपुरुष आमदार प्रशांत ठाकूर यांना भरघोस मतांनी विजयी करा

महिला मोर्चाच्या तालुका सरचिटणीस प्रतिभा भोईर, कल्पना ठाकूर, कुंदा मेंगडे, अंकित घरत यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

महायुती सरकारने जनतेसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवून त्यांचा लाभ मिळवून दिला आहे. लाडकी बहीण योजना राबवून महिला सक्षमीकरणाचे काम केले तसेच आता या योजनेचे पैसे वाढवून देण्यात येणार आहेत. त्यामुळे गतिमान पद्धतीने काम करणारे महायुतीचे सरकार राज्यात पुन्हा सत्तेत आणा, असे आवाहन भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी मतदारांना केले.

# पेणच्या खवसावाडी ते तांबडी रस्त्याचे काम लवकरच होणार पूर्ण

**अलिबाग : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील खवसावाडी, उंबरवाडी, तांबडी रस्त्याचे काम महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेच्या माध्यमातून करण्यात येत आहे. हे काम पूर्ण करण्याची अंतिम मुदत २४ जानेवारीपर्यंत असून रस्त्याचे काम लवकरच हाती घेऊन वेळेत पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती अलिबाग उपविभाग उपअभियंता राजेंद्र खेडेकर यांनी दिली आहे.

पेण तालुक्यातील बोरगाव येथील खवसावाडी येथील एका महिलेचा मृतदेह पाच किमी अंतरापर्यंत झोळीत टाकून न्यावा लागला होता. या घटनेनंतर खवसावाडी येथील रस्त्याच्या कामाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता, तसेच रस्त्याचे काम सुरु न करता ठेकेदाराला बिलाची रक्कम अदा करण्यात आला असल्याचा आरोपही करण्यात आला होता, मात्र रस्त्याचे काम सुरू करण्यात न आल्याने ठेकेदाराला कोणतेही बिल अदा करण्यात आला नसल्याचे महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेने स्पष्ट केले आहे.

खवसा, उंबरवाडी, तांबडी रस्त्याच्या कामाचा ठेका सिद्धीविनायक कन्स्ट्रक्शन कंपनीला २५ जानेवारी रोजी देण्यात आला आहे. हे काम करण्यासाठी कंपनीला २४ जानेवारी २०२५पर्यंत मुदत देण्यात आली असून, लवकरच काम सुरू करून वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना ठेकेदाराला देण्यात आल्या आहेत. खवसावाडी येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी शनिवारी (दि.९) भेट दिली. या वेळी त्यांनी येथील रस्त्याची तसेच इतर विकासकामांची पाहणी केली तसेच ग्रामस्थांसोबत चर्चा केली. रस्त्याच्या कामाबाबत महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेच्या अधिकाऱ्यांसोबत संपर्क साधून लवकरच रस्त्याचे काम पूर्ण करण्याची सूचना केली, तसेच येथील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना विभागाच्या अधिकाऱ्यांना केल्या.

# आमदार महेश बालदींच्या उपस्थितीत विविध पक्षांतील कार्यकर्ते भाजपमध्ये











**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार महेश बालदी यांचे सक्षम नेतृत्व मान्य करून व विकासात्मक धोरणावर विश्वास ठेऊन विविध पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपच्या विकासाचे कमळ हाती घेतले. या वेळी आमदार महेश बालदी यांनी प्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.

यामध्ये खोपटे गावातील शेकाप, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच युवकांनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला. यासोबतच गुळसुंदे येथील शेकाप कार्यकर्ते, आपटा गावातील कार्यकर्ते, कालीवली गावातील कार्यकर्ते, वासांबेचे माजी प्रभारी सरपंच माधुरी भगवान जांभळेंसह कार्यकर्ते, जांभिवली ग्रामपंचायतीच्या उपसरपंच मनीषा नारायण साळवी, डोलघर गावातील करण पाटील व मित्रपरिवार, आपटा येथील सकपाल कुटुंब, कडापे (आवरे) गावातील काँग्रेस पक्षाच्या माजी ग्राम पंचायत सदस्या निशाताई महेश म्हात्रे तसेच त्यांचे सर्व सहकारी या सर्वांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

दरम्यान, मोहोपाडा येथील भव्य प्रचार सभेवेळी गुळसुंदे येथील शेकापचे चिंतामण कडवे, शिवसैनिक बजरंग भागवत, स्वप्नील चौलकर, संकेत चौलकर, विशाल उकिर्डे, सम्राट भागवत, सचिन गायकवाड, आकाश पांडे, विकी गायकवाड, समाधान गायकवाड आदींनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांचे पक्षात स्वागत करण्यात आले. या वेळी भाजपचे गुळसुंदे विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, ग्रामपंचायत सदस्य सतिश साठे तसेच संतोष साठे आदी उपस्थित होते.

यासोबतच खोपटे गावातील चांगदेव पांडुरंग ठाकूर (शेकाप), प्रशांत जगन्नाथ पाटील (राष्ट्रवादी, मच्छीमार सेल उपाध्यक्ष), गिरिधर धनाजी घरत (शेकाप), विलास चांग्या घरत, संतोष बालाकृष ठाकूर, भगीरथ परशुराम घरत, दिलीप चंग्या घरत, महेंद्र वामन ठाकूर, प्रतीक दिलीप घरत, अक्षय गणेश घरत, हरिश्चंद्र अनंत ठाकूर, निर्भय नामदेव घरत तसेच अनेक युवकांनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला.

# महायुतीकडून पनवेल शहर, खांदा कॉलनीत भव्य बाईक रॅली

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा जोरदार प्रचार




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय आणि मित्रपक्ष महायुतीचे पनवेल मतदार संघाचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारासाठी पनवेल आणि खांदा कॉलनीमध्ये भव्य बाईक रॅलीचे आयोजन सोमवारी (दि.११) करण्यात आले होते. या वेळी शेकडो कार्यकर्त्यांनी मोठ्या जोशात एकत्र येत बाईकवर झेंडे लावून घोषणा देत प्रचार केला.

पनवेलचे कार्यकुशल आमदार प्रशांत ठाकूर यांचा जोरदार सुरू आहे. त्यानुसार पनवेल शहरात भव्य बाईक रॅलीचे आयोजन सोमवारी सायंकाळी करण्यात आले होते. शहरातील सोसायटी ग्राऊंड पासून या रॅलीला सुरू झाली असून पुढे गांधी हॉस्पिटल-छत्रपती शिवाजी महाराज चौक - पंचरत्न चौक-एमजी रोड-पोटे मसाला-मुसलमान नाका-विट सेंटर-साईनगर-दि. बा. पाटील साहेब बंगला-सहस्त्रबुद्धे हॉस्पीटल-पायोनियर मॉर्डन स्विट-खांदा कॉलनी भाजपा कार्यालय- साई बाबा मंदीर-किबा हॉटेल-अष्टविनायक हॉस्पीटल-श्रीकृपा हॉल-सेक्टर ६ दुर्गामाता मंदीर-मेन मार्केट-तिर्थराज सोसायटी-खांदा कॉलनी ब्रीज खालून सेक्टर १० -सीकेटी कॉलेज आणि भाजपा कार्यालयाजवळ हीची सांगता झाली. रॅलीदरम्यान जनतेचा चांगला प्रतिसाद आमदार प्रशांत ठाकूरांना लाभला.

या वेळी कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, विश्वजीत बारणे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, राष्ट्रवादीचे नेते शिवदास कांबळे, शिवसेनचे पनवेल जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, महानगर प्रमुख ॲड. प्रथमेश सोमण, माजी उपमहापौर सीताई पाटील, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, माजी नगरसेविका दर्शना भोईर, हेमलता म्हात्रे, पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, भाजपचे पनवेल शहर उपाध्यक्ष अमित ओझे, भिमराव पोवार, युवा नेते केदार भगत, मयुरेश खिस्मतराव, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, स्वप्नील ठाकूर, रोहित जगताप, देवांशु प्रभाळे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक सहभागी झाले होते.

या बाईक रॅली दरम्यान येत्या २० ताखेला कमला समोरील बटन दाबून आमदार प्रशांत ठाकूर यांना विजयी करा, असे आवाहन मतदारांना करण्यात आले.

# माळी समाजातर्फे पाठिंबा जाहीर

**पनवेल : प्रतिनिधी**

महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना माळी समाजातर्फे पाठिंबा देण्यात येत असल्याचे मंगळवारी (दि. १२) पनवेल येथे झालेल्या माळी समाजाच्या बैठकीत जाहीर करण्यात आले. या वेळी गोव्याचे माजी आमदार दयानंद सोपटे उपस्थित होते.

भाजप, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांनी पनवेल विधानसभा मतदार संघातील समाजातील कार्यकर्त्यांची संत सावता माळी हॉल पनवेल येथे बैठक बोलवली होती. या वेळी गोव्याचे माजी आमदार दयानंद सोपटे, प्रदेश महामंत्री वनिता लोंढे, भाजप पनवेल शहर सरचिटणीस माधव राव गांगुर्डे, ओबीसी मोर्चा प्रदेश सदस्य प्रशांत फुलपगार, माजी उपनगराध्यक्ष सुभाष भुजबळ, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे राकेश भुजबळ, गौरव कांडपिळे, अजय कांडपीळे आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार दयानंद सोपटे यांनी महाराष्ट्रात महायुतीलाच का मते द्यावी याबद्दल मार्गदर्शन केले. ॲड. मनोज भुजबळ यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या कामाची माहिती दिली. आपल्या समजला ते नेहमीच सहकार्य करीत असल्याने त्यांना २० तारखेला कमळ या निशाणी समोरील बटण दाबून निवडून देण्याचे आवाहन केले. प्रदेश महामंत्री वनिता ताई लोंढे यांनी ही या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांना माळी समाजा तर्फे पाठिंबा देण्यात येत असल्याचे एकमताने जाहीर करण्यात आले.



# जनता खंबीरपणे आमदार महेश बालदींच्या पाठिशी उभी राहिल -चंद्रकांत घरत

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम उरणचे आमदार महेश बालदी यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे तसेच या विधानसभा मतदारसंघातील सुमारे ४० हजार महिलांना लाडक्या बहिणीच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ देण्याचे काम केले तसेच राज्य सरकारने लाडक्या बहिणीना १५०० रुपयांवरून २१०० रुपये देण्याची घोषणा केली आहे.त्यामुळे विरोधकांनी कितीही वल्गना केल्या तरी जनता खंबीरपणे उरणचे दमदार आमदार महेश बालदी यांच्या मागे खंबीरपणे उभी राहणार असून ते या मतदारसंघाचे नेतृत्व करण्यासाठी पुन्हा एकदा आमदार म्हणून निवडून येणार असल्याचा विश्वास भाजपचे जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत यांनी व्यक्त केला आहे.

होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत यांनी बोलताना सांगितले की, उरण विधानसभा मतदारसंघात खऱ्या अर्थाने विकासाची गंगा आणण्याचे काम उरणचे आमदार महेश बालदी यांनी केले आहे.त्यांनी लाखो दास भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या शिवस्मारकाची उभारणी दास्तान फाटा येथे करुन, केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून सर्वप्रथम जागतिक किर्तीच्या घारापुरी लेणीला अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचे काम हे तिर्थरुप आप्पासाहेब धर्माधिकारी कुटुंबाच्या उपस्थितीत केले.तसेच आपल्या मतदारसंघातील गावोगावी विकास कामांना निधी उपलब्ध करून देत १०० टक्के आदिवासी बांधवांची वस्ती असलेल्या रानसई या गावाचा चेहरामोहरा बदलण्याचे काम केले आहे.



दरडग्रस्त इर्शाळवाडीतील आदिवासी बांधवांचे पुनर्वसन करण्याचे काम हे या अगोदरच्या आमदारांना जमले नाही ते लोकसेवक म्हणून महेश बालदी यांनी त्यांच्या कार्यप्रणालीमध्ये करून दाखविले आहे.

अशा कार्याशी तत्पर व सर्व समाजाला एकत्र घेऊन काम करणारे उरणचे आमदार महेश बालदी हे होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत ४० हजार मताधिक्याने विजयी होणार असा आशीर्वाद लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उलवे नोड येथील जाहीर सभेत दिला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा उरणच्या सर्वांगीण विकासासाठी महेश बालदी यांना निवडून देण्यासाठी भाजप महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते कामाला लागले असून गावोगावच्या प्रचार दौरात जनता जनार्दनाचा आशिर्वाद आमदार महेश बालदी यांना मिळत आहे. त्यामुळे विरोधकांनी कितीही वल्गना केल्या तरी २० नोव्हेंबर २०२४च्या निवडणूकीत महेश बालदी हे भरघोस मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास चंद्रकांत घरत यांनी शेवटी व्यक्त केला आहे.

# चिरनेरमध्ये बासमती तांदळाचा यशस्वी प्रयोग

**उरण : रामप्रहर वृत्त**

चिरनेर गावाच्या शेतशिवारात एका तरुण शेतकऱ्याने अनोखा प्रयोग करून सुगंधी बासमती तांदळाचे उत्पन्न घेतले आहे,विशेष म्हणजे त्याने पिकविलेल्या बासमती तांदळाचे उत्पन्न दरवर्षीपेक्षा दुप्पट घेतल्याने भातशेतीतील या अनोख्या प्रयोगाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

उरण तालुका हे कधीकाळी भाताचे कोठार होते मात्र उरण तालुक्यातील शेत जमीन केंद्र आणि राज्य सरकारच्या प्रकल्पांसाठी संपादित केली गेल्यामुळे आणि औद्योगिकरणासाठी संपादित केल्यामुळे तालुक्यातील भातलागवडीखालील क्षेत्र कमालीचे घटले आहे. अशातच चिरनेर येथिल संतोष बाळकृष्ण चिर्लेकर या शेतकऱ्याने बासमती तांदळाची यशस्वी लागवड करून विक्रमी पिक घेतले आहे.




एका एकर मध्ये संतोष चिर्लेकर यांनी तब्बल दोन खंडी दोन मण म्हणजे जवळ जवळ तब्बल १७०० किलो भाताचे उत्पादन घेतले आहे.

संतोष चिर्लेकर यांचा वडिलोपार्जित भाजीपाल्याच्या मळ्याचा व्यवसाय आहे. शेतीमध्ये ते नेहमी नवनवीन प्रयोग करत असतात. दरवर्षी पारंपारिक भात पिकाचे उत्पादन घेणारे संतोष यांनी यावर्षी बासमती पिकाची लागवड करण्याची संकल्पना राबविली. त्यांनी पनवेल येथिल बियाणा केंद्रातून बासमती मधुमती प्रकारचे बियाणे त्यांनी खरेदी केले आणि त्यांनी त्याची पेरणी केली. रोपे तयार झाल्यानंतर लावणीपूर्वी त्यांनी चिखलावर १८ - १८ - १० हे खत फवारले त्यानंतर पिक तयार होण्याच्या बेतात असताना एक वेळ युरीया खताची मात्रा दिली. त्यामुळे या पिकाचे भरघोस उत्पादन आले, मात्र हे पिक लांब तणाचे असल्यामुळे आणि उशिरापर्यंत पाऊस पडल्यामुळे हे पिक आडवे पडले होत. तरी सुद्धा संतोष चिर्लेकर यांना तब्बल ४२ मण म्हणजे जवळ जवळ १७०० किलो भाताचे उत्पादन निघाले.

फक्त एक एकरामध्येच या भाताची लागवड केली होती. विशेष म्हणजे यापुर्वी दरवर्षी ते पारंपारिक भाताची लागवड करत असत आणि त्यातून त्याना फक्त १५ ते १६ मण भाताचे उत्पादन मिळत असे. यावर्षी त्यांनी बासमतीचा प्रयोग केल्याने त्यांचे उत्पादन दुप्पटीपेक्षा अधिक वाढले आहे. कोणतीही शास्त्रीय माहिती नसताना त्यांनी भरघोस बासमती पिकाचे उत्पादन घेतल्याने त्यांचे सर्वत्र कौतूक होत आहे. संतोष चिर्लेकर यांच्या या बासमतीच्या प्रयोगामुळे उरण मधिल मरगळीस आलेल्या शेतीला चालना देण्यासाठी आशेचा किरण मिळाला आहे.

# ट्रकच्या धडकेत टोलवसुली कर्मचारी ठार

**पनवेल : वार्ताहर**

रोडपाली येथील फुडलँड कंपनीसमोरील उड्डाणपुलावरुन भरधाव येणा-या ट्रकने शनिवारी सायंकाळी ३२ वर्षीय टोल वसूल करणाऱ्या कर्मचाऱ्याला चिरडले. दोन वाहनांमध्ये हा कर्मचारी चिरडला गेला. घटनेनंतर धडक देणारा ट्रकचालक फरार झाला होता. ट्रकचालक कळंबोली पोलीस ठाण्यात हजर झाला. संदीप मिश्रा असे या मृत कर्मचाऱ्याचे नाव आहे. भरधाव वेगाने ट्रक चालविल्याबद्दल कळंबोली पोलीस कारवाई करत आहेत.

रोडपाली येथील फुडलँड कंपनीसमोरील उड्डाणपुलावर सायंकाळच्या सूमारास नेहमी वाहतूक कोंडी असते. तळोजा औद्योगिक वसाहतीमधून सायंकाळच्या सूमारास कंपन्यांमधून एकाचवेळी सूटणाऱ्या वाहनांमुळे ही कोंडी होते. या पुलावरुन विरुद्ध दिशेने सुद्धा वाहने पळविली जातात. नवी मुंबई वाहतूक पोलीसांच्या मागणीनंतर पनवेलमधील वाहतूक कोंडीवर पोलीसांना सहकार्यासाठी पालिकेने वार्डनची नेमणूक वाहतूक नियमनासाठी केली आहे. रोडपाली चौकात हे वार्डनही पोलीसांकडून तैनात केले असतात. संदीप मिश्रा हे एका अवजड वाहनाकडील टोलची पावती तपासत असताना फुडलॅण्ड कंपनीसमोरील उड्डाणपुलावरुन आलेल्या ट्रकने संदीपला धडक दिली. या धडकेमध्ये संदीप दोन्ही ट्रकच्या मधोमध चिरडून घटनास्थळीच तो ठार झाला. टोलच्या इतर कर्मचाऱ्यांनी संदीपला महाराष्ट्र भूषण नानासाहेब धर्माधिकारी ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी संदीपला मृत घोषित केले.

या घटनेनंतर ट्रकचालक फरार झाला होता. ट्रकचालक बिलाल अहमद हजरत अली याला पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलीसांनी बिलाल अली याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे १२५ (ब), २८१, १०६ (१), महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ प्रमाणे १८४, १३४, १७७ अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

## संपादकीय

# निधीची जबाबदारी कुणाची?

पृथ्वीची तापमानवाढ रोखण्यासाठी उपाययोजना तर व्हायलाच हवी पण त्यासाठीची आर्थिक जबाबदारी कुणाची? अनेक वर्षे मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जन करत आलेल्या श्रीमंत देशांची की आता कार्बन उत्सर्जनास जबाबदार असलेल्या विकसनशील देशांची? यंदाच्या हवामान बदल परिषदेत हाच कळीचा मुद्दा चर्चिला जाणार आहे.

**अझरबैजानची राजधानी बाकू येथे ११ ते २२ नोव्हेंबर दरम्यान 'कॉप २९' ही हवामान बदल परिषद होते आहे. संयुक्त राष्ट्रांकडून १९९२ पासून अशा परिषदेचे आयोजन केले जाते आहे. दरवर्षी या परिषदेत जगभरातील देश कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी काय उपाय योजले पाहिजेत याविषयी चर्चा करतात. 'कॉन्फरन्स ऑफ पार्टीज'चे हे २९ वे वर्ष असल्यानेच तिला 'कॉप२९' संबोधले जाते आहे. पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे जगभरातच नैसर्गिक आपत्तींचे रौद्र रूप दिसते आहे. भारतातील मान्सूनचे स्वरूप लक्षणीयरित्या बदलले असून अल्प काळात ढगफुटीसदृश अतिवृष्टी हे वरचेवर घडताना दिसते आहे. अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी दरडी कोसळणे, भूस्खलन यांसारख्या घटना घडत आहेत. अशीच नैसर्गिक आपत्तींची वारंवारता आणि तीव्रता अन्य देशांतही वाढलेली दिसते आहे. अमेरिकेतील हरिकेन्स, स्पेन आणि सहारा वाळवंटातला पूर, अनेक देशांत हिमाच्छादित शिखरे उघडी पडणे हे सारे बदल पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे आहेत हे हळूहळू सगळ्यांना पटू लागले आहे. या बदलांचा वेग आता वाढल्याने त्यावरील उपाययोजनाही वेगाने व्हायला हवी यासही मान्यता मिळू लागली आहे. कॉप परिषद पहिल्यांदा आयोजित केली गेली तेव्हा जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदल या संकल्पना अनेक देशांसाठी नवीन होत्या आणि अनेकांनी त्यास मान्यता देण्यास वेळही घेतला. पृथ्वीच्या तापमानवाढीस जीवाश्म इंधनाच्या वापरातून उत्सर्जित होणारे वायू मोठ्या प्रमाणात जबाबदार आहेत हे सगळ्यांना पटायलाही बराच वेळ लागला. यावरून विकसित देश आणि विकसनशील देश यांच्यात दोन तटही पडले. जीवाश्म इंधनाचा वाट्टेल तसा वापर करून विकसित देशांनी स्वत:ची प्रगती साधली आणि आता ते विकसनशील देशांना मात्र पृथ्वीची तापमानवाढ रोखण्याकरिता जीवाश्म इंधनांचा वापर कमी करण्याचा उपदेश देत आहेत, अशी टीकाही झाली. त्यानंतर पॅरिस करारात असे ठरले की, श्रीमंत देशांनी जगातल्या विकसनशील देशांना कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आर्थिक मदत करावी, पण त्यादृष्टीने प्रत्यक्षात फारसे काही झाले नाही. यंदाच्या परिषदेत याच दृष्टीने निधी उभारणीवर मोठी चर्चा अपेक्षित आहे. यापूर्वी शंभर अब्ज डॉलरच्या निधी उभारणीवर बहुतेक देशांनी सहमती दर्शवली होती. आता ही रक्कम आणखी वाढवून एक लाख कोटी डॉलर इतकी करण्यासंबंधात चर्चा होणार आहे. भारत आणि चीनसारखे कार्बन उत्सर्जन करणारे देश आणि आखातातले तेल उत्खनन करणारे देश हे विकसनशील देश गणले जातात. पण युरोपियन युनियन आणि इतर काही प्रगत देशांनी भारत आणि चीन यांसारखे देश या मोठ्या अर्थव्यवस्था गणल्या जाव्यात आणि या देशांकडूनही अधिकचा निधी गोळा केला जावा, अशी मागणी केली आहे. भारतासाठी म्हणूनच ही परिषद महत्त्वाची आहे. कारण भारताला हवामान बदलाचे तीव्र परिणाम भोगावे लागत असून त्यासाठी भारतालाच निधीची गरज आहे. कार्बन उत्सर्जनास अनेक वर्षे मोठ्या प्रमाणात कारणीभूत राहिलेल्या देशांनी त्याची जबाबदारी उचलावी ही भारताची भूमिका योग्यच आहे.**

# एकनाथांचे शिष्य व प्राचीन मराठी कवी कृष्णदयार्णव

कृष्णदयार्णव (मूळ नाव : नरहर नारायण जोशी–कुलकर्णी) (जन्म : कोपर्डे–सातारा, अक्षय्य तृतीया–इ.स. १६७५; – पैठण, १३ नोव्हेंबर १७४०) हे मराठी कवी होते. एकनाथांचे शिष्य असलेल्या कृष्णदयार्णवांनी 'श्रीकृष्णस्वयंवर' नावाचा ओवीबद्ध ग्रंथ रचला.

प्राचीन मराठी कवी कृष्णदयार्णव यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील कोपर्डे (कोपारूढ) ह्या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव बहिणा आणि वडिलांचे नारायण. कृष्णदयार्णव यांचे मूळ नाव नरहरी असे होते. महाराष्ट्रातील तत्कालीन राजकीय अस्थिरतेमुळे ते कोपर्डे सोडून मराठवाड्यातील आंबेजोगाई येथे आले. तेथे गोविंद चौधरीनामक आनंदसंप्रदायी पुरुषाकडून दीक्षा घेतली.

कृष्णदयार्णवांचे घराणे पिढीजात वतनदार असलेल्या जोशी – कुलकर्ण्यांचे. वडील नारायणराव आणि आई बहिणाबाई. वयाच्या पाचव्या वर्षी मुंज झाल्यावर वडिलांच्या हाताखाली कृष्णदयार्णवांचे पारंपरिक पद्धतीने शिक्षण सुरू होते. वयाच्या आठव्या वर्षी त्यांचे लग्न झाले. ते अवघे १२ वर्षांचे असताना त्यांचे वडील वारले व प्रपंचांचा भार त्यांच्यावर पडला. या सुमारास औरंगजेबाचे दक्षिणेवर आक्रमण झाल्याने त्यांनी कुटुंबीयांसह अंबेजोगाई येथे स्थलांतर केले.

पुढे गुरू श्रीगोविंद यांनी कृष्णदयार्णव यांना दीक्षामंत्र दिला (सन १६९६). त्यांच्या हाताखाली शास्त्राध्ययन केल्यावर ते अंबेजोगाईस परतले. पण तो तोपर्यंत सारा मुलुख मोगलांनी उद्ध्वस्त केला होता. तेव्हा बीडजवळील पिंपनेर येथे ते स्थायिक झाले.

कृष्णदयार्णवांना महारोग लागला. त्यावर उपाय म्हणून भागवताच्या दशमस्कंधावर त्यांनी 'हरिवरदा' नावाची प्राकृत टीका लिहिण्यास सुरुवात केली. त्यावेळी त्यांचे वय ५४ होते. या ग्रंथास श्रीधरी टीकेचा आधार आहे. पूर्वार्धाचे ४९ अध्याय संपले व रोग नाहींसा झाला. उत्तरार्धाचे ३७ अध्याय संपविले, ३८ व्या अध्यायाचे २३ श्लोक झाले आणि कृष्णदयार्णवस्वामी पैठण येथें समाधिस्त झाले(शके १६६२ मार्गशीर्ष). या ग्रंथाचे लेखन तब्बल १६ वर्षे चालले. ४२ हजार ओव्या लिहून हा ग्रंथ अपुराच होता. त्यातील ओवी एकनाथांच्या ओवीसारखी साडेचार चरणी आहे. या ग्रंथात फारशी – अरबी शब्दांच्या प्रवेश होऊ नये, म्हणून त्यांनी संस्कृत प्रतिशब्द घडविले. तथापि सन १७४० च्या सुमारास कृष्णदयार्णवांचे निधन झाल्याने, अपुरा राहिलेला हा ग्रंथ त्यांचे शिष्य उत्तमश्लोक यांनी पुढे पूर्ण केला.

ज्ञानेश्वरीचीहि छाया ग्रंथावर पडलेली आहे. विद्वान लोक या हरिवरदा ग्रंथास फार मान देतात. यावरून कर्त्याची विद्वत्ता व बहुश्रुतपणा दिसून येतो. काव्याच्या दृष्टीनेंहि ग्रंथ चांगला वठला आहे. विस्ताराच्या मानानें हा ग्रंथ प्रचंड आहे. याची एकंदर ओवीसंख्या ४२ हजार आहे. स्वामींचा तन्मयानंद नांवाचा आणखी एक ग्रंथ व बरेचसे अभंग आणि पदें इतकी कृति सध्यां उपलब्ध आहे महाराष्ट्र सारस्वत. याशिवाय, काही स्फुट कविताही कृष्णदयार्णवांच्या नावावर आहेत. कृष्णदयार्णवांनी श्रीकृष्ण उपासनेचा भारतभर प्रसार केला. त्यासाठी १६ मठांची त्यांनी स्थापना केली.

**कृष्णदयार्णवांची ग्रंथरचना**

चिन्मयानंदबोस, तत्त्वयानंद, विचारचंद्रिका, सारांशात्मक गीता, शिवचरित्रकथा, श्रीकृष्णस्वयंवर (ओवीबद्ध), सिद्धान्तसार, हरिवरदा (ओवीबद्ध)

श्रीमद्भागवतच्या दशम स्कंधावर ४२ हजार ओव्यांची टीका. संत एकनाथांचा अनुग्रह स्वप्नामध्ये झाल्यावर त्यांनी भागवताच्या दशम स्कंधावर सुंदर मराठीत टीका लिहिली. ही टीका त्यांनी अंबाजोगाईच्या योगेश्वरी देवीच्या परिसरात बसून लिहिली असे म्हणले जाते. हा ग्रंथ साहित्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा असून मराठी भाषेत घुसवलेले उर्द, फार्सी व परकीय शब्द न वापरता अस्सल देशी मराठी शब्द वापरून कृष्णदयार्णव यांनी मराठी भाषेला या हरीवरदा टीकेतून मोठीच भेट दिली आहे.

घरोघरी भिक्षा मागताना ते 'कृष्णदयार्णव' ह्या नामाचा मोठ्याने घोष करीत असल्यामुळे त्याच नावाने ते ओळखले जाऊ लागले, असे सांगतात. वयाची चाळिशी उलटल्यानंतर त्यांना महारोग झाला. त्यावर उपाय म्हणून गुरूने आणि इतर अनेक संत सज्ञनांनी त्यास भागवताच्या दशमस्कंधावर मराठी भाष्य लिहिण्याचा उपदेश केला. त्यास अनुसरून त्यांनी हरिवरदा हा ग्रंथ लिहावयास घेतला. ह्या ग्रंथाच्या पूर्वार्धातील सर्व, म्हणजे ४९ व उत्तरार्धातील ३७ अध्याय त्याने स्वतः पूर्ण केले आहेत. ३८ व्या अध्यायाच्या काही ओव्या पूर्ण केल्यानंतर पैठण येथे ते निर्वतले. पुढील तीन–साडेतीन अध्याय त्याचा शिष्य उत्तमश्लोक ह्याने पूर्ण केले (१७४३).

हरिवरदा ओवीबद्ध असून (एकूण ४२,४८७ ओव्या) त्यातील ओवी एकनाथांच्या ओवीसारखी साडेचार चरणी आहे. भागवताच्या दशमस्कंधावरील श्रीधरी टीकेचा मुख्य आधार ह्या ग्रंथासाठी घेण्यात आला असून तसे ग्रंथात नमूदही केले आहे. अर्थात, इतरही अनेक टीकांचे सार त्यात आणले आहेच. कृष्णदयार्णवाची काव्यरचना काही ठिकाणी पाल्हाळिक झाली असली, तरी अनेक ठिकाणी वेधक वर्णनांनी नटलेली आहे. ह्या ग्रंथातून त्यांच्या विद्वत्तेचाही प्रत्यय येतो. आपल्या ग्रंथात फार्सी–अरबी शब्दांचा प्रवेश होऊ नये म्हणून त्याने अनेक संस्कृत प्रतिशब्द घडविले. हा संपूर्ण ग्रंथ आता आठ खंडांत प्रसिद्ध झालेला आहे (१९५५–६१). ह्याशिवाय तन्मयानंदबोध, चिन्मयानंदबोध हे श्लोकबद्ध लहान ग्रंथ, सु. १५० पदे, ६५ स्फुट कवने, काही अभंग व मुकुंद राजावरील एक आरती अशी त्याची रचना उपलब्ध आहे. दत्तजननोत्साहवर्णन, विचारचंद्रिका, सिद्धान्तसार, शिवरात्रिकथा, अशी काही ग्रंथरचना कविकाव्यसूचिकार चांदोरकर कृष्णदयार्णवाच्या नावावर देतात. त्याचे एक गीतासार असल्याचे डॉ. शं. गो. तुळपुळे सांगतात. सदर ग्रंथांपैकी दत्तजननोत्साहवर्णन हा ग्रंथ कृष्णदयावर्णाचा नसून त्याचा शिष्य उत्तमश्लोक ह्याचा असल्याचे आता अधिक संशोधनान्ती दिसून आले आहे.

**(साभार : इंटरनेट)**

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी जागरूकतेने मतदान करावे

सध्या आमच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वेध लागलेत ते परीक्षा व मतदानाचे. बरेच तरुण विद्यार्थी तर पहिल्यांदा मतदान करण्यासाठी खूप उत्सुक आहेत कारण १८वे वरीस मोक्याचं आहे.

आपल्या सर्वांच्या भविष्यासाठी, देशाच्या भविष्यासाठी योग्य उमेदवार निवडून देणं आपलं आद्यकर्तव्य आहे. ही संधी आपल्या सर्वात मोठ्या लोकशाही देशात पाच वर्षांत एकदाच मिळते. आपल्या देशाचे सैनिक सीमेवर अहोरात्र मेहनत घेऊन कर्तव्य बजावत सर्वांचे संरक्षण करीत असतात. आपणांस फक्त मतदान करुन योग्य उमेदवाराची निवड करायची आहे.



मित्रांनो, सर्वांनी मतदान करून नंतरच सुट्टीचा आनंद घ्यायचा आहे. प्रत्येकाचं एक मतं खूप महत्त्वाचे आहे, कारण १९१७ला अहमदाबादमध्ये सरदार वल्लभभाई पटेल केवळ एका मताने पराभूत झाले होते. नाझी पक्षाचे नेते हिटलर केवळ एक मत जास्त असल्याने सत्तेत आले, अशी अनेक उदाहरणे आहेत.

महाराष्ट्रातील निवडणूक २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६पर्यंत नियोजित आहे. मतदान करण्यासाठी मतदारयादीत नाव असणे आवश्यक आहे व पुढीलपैकी कोणतेही एक कागदपत्रे सादर करावे. उदा – मतदार कार्ड, आधार कार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट, बँक पासबुक, ड्रायव्हिंग लायसन्स इ.. तरी सर्वांनी नक्कीच अमूल्य असे मतदान करावे, ही विनंती.

**–प्रा. महेश धायगुडे,** रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खारघर तथा क्षेत्रीय समन्वयक, नवी मुंबई, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, मुंबई विद्यापीठ



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअॅपमध्ये चॅट उघडताच होते ग्रीन स्क्रीन

तुम्ही जर व्हॉट्सअॅपचं बीटा व्हर्जन वापरत असाल तर तुम्हाला सावधान राहण्याची आवश्यकता आहे. पच्या बीटा २.२४.२४.५ व्हर्जनमध्ये एक मोठा बग समोर आला आहे. या बगमुळे युजर्सच्या फोनची स्क्रीन पूर्णपणे ग्रीन म्हणजेच हिरव्या रंगाची होत आहे. ही समस्या विशेषतः हजारो Android युजर्सना येत आहे. iOS बीटा टेस्टर्सना सध्या अशा कोणत्याही समस्येचा सामना करावा लागत नाही.



व्हॉट्सअॅप वापरणाऱ्यांची संख्या सर्वांत जास्त आहे. त्यामुळे त्यामध्ये नेहमीच नवनवे फिचर येत असतात, मात्र सर्वच फिचर सक्सेक होतात असे नाही. काही अपडेटमुळे धोकाही निर्माण होऊ शकतो. अशावेळी सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे.

युजर्स चॅट किंवा मेसेज उघडण्याचा प्रयत्न करताच, स्क्रीन अचानक ग्रीन होते. अॅप बंद होईपर्यंत संपूर्ण स्क्रीन ग्रीनच दिसते. हजारो युजर्सना या समस्येचा सामना करावा लागत आहे. या समस्येबद्दल, काही युजर्सनी ट्विटरवरदेखील पोस्ट केली आहे. व्हॉट्सअॅप बीटा व्हर्जन योग्यरित्या काम करत नाही आणि व्हॉट्सअॅप वापरताना स्क्रीन पुन्हा पुन्हा ग्रीन होते. मात्र, या समस्येबाबत मेटाकडून अद्याप कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

**'असा' सोडवा प्रॉब्लेम**

सध्या ही समस्या व्हॉट्सअॅपच्या स्टेबल व्हर्जनमध्ये नाही. ही समस्या सोडवायची असेल तर काही स्टेप्स फॉलो कराव्या लागतील.

– व्हॉट्सअॅप बीटा व्हर्जनवरून स्टेबल व्हर्जनवर स्विच करा. यामुळे तुमचं व्हॉट्सअॅप पूर्णपणे सुरक्षित होईल.

– शक्य असल्यास, व्हॉट्सअॅप वेब किंवा लॅपटॉप, टॅबलेट किंवा आयफोनसारख्या इतर सर्व उपकरणांवर वापर करा. याच्या मदतीने तुम्ही बग टाळू शकता

– व्हॉट्सअॅप अनइन्स्टॉल करून पुन्हा इन्स्टॉल करा, परंतु हे करण्याआधी Google Cloud वर तुमच्या मेसेजचा बॅकअप घ्यायला विसरू नका, जेणेकरून तुमचे चॅट्स सुरक्षित राहतील.

– मेटा समस्येचे निराकरण करेपर्यंत तुम्ही वाट पाहू शकता.

# आद्य मराठी नाटककार गोविंद बल्लाळ देवल



## निमित्त

प्रसिद्ध नाटककार आणि नाट्यदिग्दर्शक म्हणून गोविंद बल्लाळ देवल यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म सांगली संस्थानातील हरिपूर येथे १३ नोव्हेंबर १८५५ रोजी झाला.

वडील बल्लाळ ऊर्फ बाळाजीपंत हे अल्प वेतनावर संस्थानी नोकर होते. देवलांचे ज्येष्ठ बंधू कृष्णाजीपंत यांचा संगीतशास्त्राचा मोठा व्यासंग होता. मधले बंधू रामभाऊ हे त्या काळी प्रसिद्ध असलेल्या इचलकरंजीकर नाटक मंडळीतील एक उत्तम नट होते. देवलांचे मराठी शिक्षण प्राथमिक शाळेत आणि संस्कृतचे अध्ययन खासगीरीत्या, हरिपूरला झाले असावे. वडील बंधूना नोकरी लागल्यावर कोल्हापूर व बेळगाव येथे माध्यमिक शिक्षण होऊन १८७८मध्ये ते मॅट्रिक झाले. बेळगावच्या रहिवासात सुप्रसिद्ध नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्याशी त्यांचा दाट परिचय झाला. पुढे पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजातील शेतकी शिक्षणवर्गाचा अभ्यासक्रम पूर्ण करून देवलांनी १८८०मध्ये प्रमाणपत्र मिळविले. सांगलीचा नाट्यानुकूल परिसर, वडील बंधू संगीशास्त्रज्ञ, दुसरे बंधू हे कुशल नट आणि किर्लोस्करांसारखे मुरब्बी नाट्यगुरू असे त्यांच्या भोवतालचे वातावरण नाट्याला पोषक होते. साहजिकच अल्पकाळ शिक्षकाचा व्यवसाय केल्यावर देवलांनी हयातभर नाट्यसेवेला वाहून घेतले.

पुण्यात असताना देवल आणि शंकरराव पाटकर यांनी आर्योद्धारक नावाची नाटक मंडळी नाट्यकलेला नवे वळण लावण्याच्या हेतूने स्थापन केली. या मंडळीत असताना परशुरामपंततात्या गोडबोल्यांनी मराठीत अनुवादिलेल्या वेणीसंहार नाटकातील अश्वत्थामा आणि महादेवशास्त्री कोल्हटकरांच्या अथेल्लोमधील अजितसिंग या त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. महादेवशास्त्र्यांनी शेक्सपिअरच्या ऑथेल्लो या मूळ नाटकाचे भाषांतर केले होते. त्यावरून अजितसिंग ही रंगावृत्ती तयार करण्यात आली होती. ती करण्याच्या कामीही देवलांनी आपल्या लेखणीचा हातभार लावला. १८८० साली किर्लोस्कर नाटक मंडळी स्थापन झाली. किर्लोस्कर पद्धतीची नाट्यपदे रचण्यात देवल कुशल होते. किर्लोस्करांच्या शाकुंतलातील शकुंतलेची पदे देवलांनी रचली व त्या मंडळीचे ते आधारस्तंभ बनले. देवल निपुण नाट्यशिक्षकही होते. भाऊराव कोल्हटकर, नानासाहेब जोगळेकर, गणपतराव बोडस, काशिनाथपंत परचुरे, बालगंधर्व यांसारख्या नटश्रेष्ठांना देवलांनी तालीम देऊन तयार केले.

देवलांनी इंग्रजीवरून तीन, संस्कृतवरून तीन व एक स्वतंत्र अशी एकूण सात नाटके रचली. टॉमस सदर्नकृत द फेट्ल मॅरेजवरुन गॅरिकने तयार केलेल्या इझाबेला या रंगावृत्तीच्या आधारे दुर्गा (१८८६), शेक्सपिअरकृत ऑथेल्लोची रंगावृत्ती झुंझारराव (१८९०) व मर्फी आणि मोल्येर यांच्या अनुक्रमे ऑल इन द राँग आणि गॉनारेल या नाटकांवरुन फाल्गुनराव अथवा तसबिरीचा घोटाळा (१८९३) ही त्यांची परकीय नाट्यकृतींची रूपांतरे होत. त्यांच्या दुर्गा नाटकाला राजाराम कॉलेजचे, तर शापसंभ्रमला इंदूरच्या महाराजांचे पारितोषिक मिळाले होते, पण या दोन्ही नाटकांपेक्षा त्यांच्या मृच्छकटिक, झुंझारराव आणि संशयकल्लोळ यांना प्रायोगिक यश विशेष लाभले. तथापि यांहीपेक्षा त्यांचे सं. शारदा (१८९९) हे नाटक साहित्यिक आणि प्रायोगिक या दोन्ही दृष्टींनी अद्वितीय ठरले. शारदेसारखी अस्सल सामाजिक नाट्यकृती तत्पूर्वी मराठी रंगभूमीवर आलेली नसल्याने मराठी सामाजिक रंगभूमीचा पाया घालण्याचे श्रेय देवलांना मिळते. देवल हे सामाजिक मतप्रणालीच्या दृष्टीने रानडेपंथीय सुधारक होते. शेवटी काही वर्षे देवल रंगभूमीवरून निवृत्त झाले होते. मधुमेहाच्या विकाराने त्यांचे १४ जून १९१६ रोजी मिरज येथे देहावसान झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!




श्रीवर्धन : दिवेआगार येथील समुद्रकिनाऱ्यावर सुर्यास्ताच्या वेळी खळखळणाऱ्या लाटांचा आनंद घेणारे पर्यटक.

## आरोग्य प्रहर

# नाक बंद होतंय? वास येत नाही? आजारांचे लक्षण

नाक बंद असताना कोणत्याही गोष्टीचा वास न येणे हे एक सामान्य लक्षण आहे. पण दीर्घकाळ वास न येणे हे धोकादायक ठरू शकते. शंभराहून अधिक रोगांचे प्रारंभिक लक्षण म्हणजे कोणत्याही गोष्टीचा वास न येणे. त्यामुळे जर तुम्हाला ही बऱ्याच काळापासून कोणत्याही प्रकारचा वास येत नसेल, तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या. कारण एका संशोधनानुसार हे अनेक प्रकारच्या आजारांमुळे देखील होऊ शकते. अनेकदा काही विशिष्ट आजारामुळे लोकांना कोणत्याही प्रकारचा दुर्गंध जाणवत नाही. थंडीत नाक बंद होण्यापासून ते कोविडमध्ये लोकांना काहीही वास न येण्यापर्यंत अशी लक्षणेही आपण पाहिली आहेत.



कोणत्याही प्रकारचा दुर्गंध जाणवणे ही आपल्या पाच इंदिरांपैकी एक आहे जे आपल्याला लहानपणापासूनच मिळते परंतु काही आजारांमुळे आपली ही भावना काम करणे थांबून जाते. त्यामुळे आपली कोणत्याही गोष्टीचा वास घेण्याची क्षमता नष्ट होते. नुकत्याच झालेल्या एका संशोधनानुसार, १३९ वैद्यकीय परिस्थिती आहेत ज्यामध्ये कोणताही वास घेण्याची आपली क्षमता नष्ट होते.

**संशोधन काय सांगते?**

चार्ली डनलॉप स्कूल ऑफ बायोलॉजीकल सायन्सेसच्या संशोधकांनी, द ऑक्सफर्ड रिसर्च सेंटर इन द ह्युमॅनिटीच्या सहकार्याने असे संशोधन केले आहे, ज्यामध्ये अशा प्रकारच्या १३९ वैद्यकीय परिस्थितीचा मानवी वास घेण्याच्या क्षमतेशी संबंध असल्याचे आढळून आले आहे. ज्यामुळे रुग्ण कोणत्याही प्रकारची दुर्गंधीचा वास घेऊ शकत नाही. हे लक्षण अगदी सामान्य मानले जात असले तरीदेखील हे विविध न्यूरोलॉजिकल आणि शारीरिक रोगांचे प्रारंभिक लक्षण असू शकते. त्याचा संबंध एखाद्या व्यक्तीच्या स्मरणशक्तीशीही असल्याचा आढळून आले आहे.

**कोणत्या रोगांशी संबंध?**

अलझायमर आणि पार्किन्सन्स सारख्या आजारांशी देखील संबंध आहे. कोरोना व्हायरस आणि सायनुसायटीस सारख्या प्रमुख आजारांशीदेखील याचा संबंध आहे. या संशोधनानुसार जर कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही गोष्टीचा वास न आल्यासारखी लक्षणे जाणवत असतील तर त्यांनी ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. कारण हे आजारांची प्रारंभिक लक्षणे असू शकतात.ज्याद्वारे रुग्णांवर उपचार करता येवू शकतात. वेळीच उपचार घेतले तर आजार वाढण्यापासून रोखणेदेखील शक्य होते.

# महायुतीच्या माध्यमातून विकासकामांना गती मिळाली -मंत्री आदिती तटकरे

## माणगावच्या विविध वॉर्डात गावबैठकांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

महायुती सरकारच्या माध्यमातून माणगावात शहरातील विकासकामांना गती मिळाली असल्याचा दावा श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार ना. आदिती तटकरे यांनी नगरपंचायत हद्दीतील वॉर्ड क्र.३मधील साईनगर येथील कॉर्नर सभेत बोलताना केला.




महायुतीच्या उमेदवार ना. आदिती तटकरे यांच्या गावबैठका व कॉर्नर सभा माणगाव नगरपंचायत हद्दीतील विविध वॉर्डातून सोमवारी (दि.११) घेण्यात आल्या. या गावबैठका व कॉर्नर सभांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या सभेला शिवसेनेचे राज्य प्रवक्ते ॲड.राजीव साबळे, जिल्हा राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्ष हर्षदा सोंडकर, माजी पं. स. सदस्य शैलेश भोनकर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष नितीन वाढवळ, भाजप शहराध्यक्ष नितीन दसवते, माजी उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, दिलीप जाधव, संदीप खरंगटे, नगरसेविका रिया उभारे, उणेगाव माजी सरपंच राजेंद्र शिर्के, माजी नगरसेवक हेमंत शेट, जयंत बोडरे, माजी नगरसेविका भाग्यश्री यादव, शशिकांत मोहिते, सुमित काळे, शहरप्रमुख सुनील पवार, उपशहरप्रमुख प्रसाद धारिया, सौरभ खैरे, दीपक मोरे, दिप्ती मोरे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी ना. आदिती तटकरे पुढे म्हणाल्या की, येथील मंजूर झालेली जी विकासकामे आहेत, ती तुमच्या सर्वांच्या पाठपुराव्याने करण्याची संधी मला मिळाली. महायुती सरकारच्या माध्यमातून शहरासाठी ५६ कोटी रुपयांची पाणीयोजना मंजूर करून आणली. नगरपंचायतीच्या इमारतीला निधी मंजूर करून आणला. शहरातील सांडपाणी व्यस्थापनासाठी ९६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे, अशाप्रकारे महायुती सरकारच्या माध्यमातून विकासकामांना आपल्याला गती देता आली. या विकासकामांबरोबरच जनतेला वैयक्तिक योजनांचा लाभही महायुती सरकारने दिला. तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने मी विधानसभेत तुमचे प्रतिनिधित्व करीत असल्याने लोकहिताची कामे मला करता आली. यापुढेदेखील विधानसभेत आवाज उठविण्यासाठी तुमच्या घरातील हक्काची व्यक्ती समजून मला घड्याळ निशाणीवर मतदान करून निवडून देऊन आपली प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी द्यावी, असे आवाहन केले.

राष्ट्रवादीचे नेते आनंद यादव म्हणाले की, शहरात खासदार तटकरे साहेबांच्या व आदितीताईंच्या तसेच महायुतीच्या माध्यमातून विकासकामे झाली आहेत. ताईंच्या समोर असणाऱ्या उमेदवारांचे शहरात कोणतेही विकासकाम नाही. लोकसभेच्या निवडणुकीत आपण थोडे मागे पडलो. त्याची भरपाई विधानसभा निवडणुकीत काढून आदितीताईंना आपण सर्वांनी जास्तीत जास्त मताधिक्यांनी विजयी करूया, असे आवाहन केले.

# मुख्यमंत्र्यांच्या सुनबाईंकडून आमदार महेंद्र थोरवे यांचा प्रचार

**चौक : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सुनबाई आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या पत्नी वृषाली शिंदे यांनी मंगळवारी (दि.१२) कर्जत-खालापूर विधानसभा महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रचारासाठी खालापूर तालुक्यात येऊन प्रचारात सहभाग घेतला.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्ती आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडे पाहिले जाते. खोपोलीजवळील साजगाव येथील धाकटी पंढरी येथे येऊन विठ्ठल-रुक्मिणी यांचे दर्शन घेऊन प्रचाराला सुरुवात केली. साजगाव परिसरातील प्रचार करून त्यांनी अष्टविनायक महड येथील श्रीवरद विनायकाचे दर्शन घेतले. त्यानंतर महड परिसरातील गावांत प्रचार करून आमदार महेंद्र थोरवे यांनी केलेल्या विकासकामांना गती देण्यासाठी पुन्हा त्यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

या वेळी आमदार महेंद्र थोरवे, डॉ. सुनील पाटील, संपर्क प्रमुख विजय पाटील, महिला आघाडी रेश्मा आंग्रे, संजय देशमुख, भाजपचे स्थानिक नेते, आरपीआयचे प्रमुख पदाधिकारी यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# पोलादपूर सवाद येथे श्री शंकराची यात्रा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील पहिल्या जत्रोत्सवाचे आयोजन सवाद गावातील श्रीशंकराच्या मंदिराच्या यात्रेने दरवर्षी त्रिपुरारी पौर्णिमेच्या मुहूर्तावर होत असते. तालुक्यातील या पहिल्या जत्रोत्सवाला दरवर्षी सप्तक्रोशी विभागातील सर्वधर्मिय भाविकांची मोठी गर्दी होत असते. यंदा शुक्रवारी (दि.१५) पहिल्या यात्रेचे आयोजन होणार आहे.



त्रिपुरारी पौर्णिमेला जागृत देवस्थान श्रीशंकराची यात्रा दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठया उत्साहात आयोजित करण्यात आली आहे. श्रीशंकर महाबळेश्वर देवस्थान ट्रस्ट सवाद यांच्या वतीने आयोजनाची जोरदार तयारी सुरू झाली आहे. सकाळी कमळ वाहून श्रीविष्णू पूजन झाल्यानंतर सायंकाळी हरिपाठ व त्यानंतर त्रिपुरा प्रज्वलन व आरती, मध्यरात्रीपर्यंत सप्तक्रोशीतील विविध भजन मंडळींचे भजन झाल्यानंतर मध्यरात्री १२ ते पहाटे २ वा.पर्यंत श्रीशंकराची पालखी मिरवणूक होऊन पालखी मिरवणूकीनंतर भाविकांच्या करमणुकीसाठी शक्तीवाले जननीमाता कलापथक पाले मंडणगड व तुरेवाले भैरवनाथ तमाशा मंडळ तुळशी, मंडणगड यांच्या जंगी सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष समीर विन्हेरकर, उपाध्यक्ष प्रकाश विन्हेरकर, खजिनदार गोविंद कोंडाळकर, विश्वस्त पुजारी सुरेश जंगम व रमेश जंगम यांनी दिली आहे.

# मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सुविधा केंद्रावर टपाली मतदान

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी मंगळवारी (दि.१९) सकाळी ८ ते दुपारी ३ वा.पर्यंत जिल्हा क्रीडा संकुल, नेहुली येथेही सुविधा केंद्रावर टपाली मतदान करता येणार आहे, अशी माहिती टपाली मतदान समिती नोडल ऑफीसर रोहन शिंदे यांनी दिली आहे.

अलिबाग विधानसभा मतदारसंघामध्ये अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी ११ व १२ नोव्हेंबर रोजी आरसीएफ हॉल कुरुळ येथे एकूण पाच टपाली मतदान सुविधा केंद्र उभारण्यात आले होते. पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयात १२ व १३ नोव्हेंबर रोजी दोन टपाली मतदान सुविधा केंद्र उभारण्यात येणार आहेत, तसेच आवश्यकता भासल्यास सदर ठिकाणी पुढील कालावधीतही ही सुविधा केंद्र कार्यरत ठेवण्यात येणार आहे.

अलिबाग मतदारसंघामध्ये विविध पथकांमध्ये, समित्यांमध्ये नियुक्त अधिकारी, कर्मचारी व होमगार्डसाठी तहसील कार्यालय येथे एक टपाली मतदान सुविधा केंद्र कार्यरत होते. आवश्यकता भासल्यास या ठिकाणी पुढील कालावधीतही हे सुविधा केंद्र कार्यरत ठेवण्यात येणार आहे.

# माथेरानमध्ये ‘उबाठा’चे पदाधिकारी शिवसेनेत



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमधील दिवाळी हंगाम संपताच येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला मोठा धक्का बसला असून सोमवारी (दि.११) उपशहर प्रमुख व विभाग प्रमुखांनी आपल्या कार्यकर्त्यांसह पक्षाला सोडचिट्ठी देत शिवसेनेत प्रवेश केला आहे.

शिवसेना शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांनी सर्वांचे स्वागत करीत पक्षाची ताकद वाढली आहे, असे सांगत महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांना मोठे मताधिक्य मिळणार असे चित्र स्पष्ट झाले आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपशहरप्रमुख सागर पाटील त्यांचे बंधू सचिन पाटील, विभागप्रमुख दिनेश कदम या सर्वांनी आपल्या कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला आहे.

गेल्या महिन्यात उबाठा गटाच्या पदाधिकाऱ्यांनी राजीनामा दिला होता, मात्र राजीनामा नाट्यमध्ये शिवसैनिकांना कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले नाही. अनेक विभागातील उबाठाचे कार्यकर्ते नाराज असल्याचे चित्र आहे. त्यामुळे अनेकांनी शिवसेनेमध्ये प्रवेश करीत आहेत.

उबाठा गटाचे नागेश परेरा, जितेश पार्टे, रितेश गायकवाड, निहाल चव्हाण, करण वाघेला, महेश शिंदे, अक्षय कदम, प्रेम काळे, निखिल बहादूर, संतोष गायकवाड प्रथमेश पाटील, जयेश पाटील, सिद्धेश पाटील, कल्पेश वाघेला, रमेश बोंबे, शैलेश वाघेला, रफिक पटेल, किरण पांचाळ, अमोल गायकवाड, शुभम मेश्राम, महेश काळे, अमोल सकपाळ यांनी या वेळी प्रवेश केला.



# रेवदंड्यात पोलिसांनी काढला रूटमार्च

**रेवदंडा : प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली असून रेवदंडा पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी रूटमार्च केला.

बाजारपेठ ते चौल नाका असे रूट मार्चचे आयोजन रेवदंडा पोलिसांनी केले. रेवदंडा बाजारपेठ, हायस्कूल, चौल रामेश्वर, चौल नाका आदी ठिकाणी ग्रामस्थांना रेवदंडा पोलिसांचे रूटमार्च करण्यात आले. प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरविले यांचे मार्गदर्शनाखाली सायंकाळी रूटमार्चला प्रारंभ झाला.

या रूटमार्चमध्ये सिआयएकएफ जवान, आरसीपी जवान, स्थानिक पोलीस, पोलीस अधिकारी उपनिरीक्षक नंदगावे, उपनिरीक्षक म्हशीलकर, उपनिरीक्षक गांगुर्डे, सर्व अंमलदारांनी सहभाग घेतला.

# पोलादपूर शहरात महायुतीचा प्रचार शिगेला

## प्रतिआमदार भरत गोगावले ठरले आकर्षण

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपुरात शिवसेना धनुष्यबाण चिन्हाचा प्रचार सर्वत्र शिगेला पोहचल्याचे दिसून येत आहे.

दररोज शहराच्या तसेच तालुक्याच्या विविध भागांमध्ये शिवसेनेचे पक्षप्रतोद आमदार भरत गोगावले यांचा प्रचार करणारे महायुतीचे कार्यकर्ते व पदाधिकारी धनुष्यबाणासमोरील बटन दाबून मतदान करण्याचे आवाहन करीत आहेत. आमदार गोगावले यांच्यासारखी वेशभूषा करून प्रचार करणारा सिद्धेश तुकाराम विमल मोरे हा तरूण कौतुकाचा विषय ठरला.

गेले दोन आमदार गोगावले यांच्या गेल्या १५ वर्षांतील कारकिर्दीतील विकासकामांची दृश्य दाखविणारा एलसीडी स्क्रीन बसविलेला फिरता चित्ररथ पोलादपूरमध्ये फिरण्यास सुरुवात झाली आहे. या चित्ररथासोबत भाजपचे मनोज भागवत, पंकज बुटाला, समाधान शेठ, सचिन बुटाला, किशन मेस्त्री, शिवसेनेच्या नगराध्यक्षा सोनाली गायकवाड, माजी नगराध्यक्ष प्रकाशआण्णा गायकवाड, उपनगराध्यक्ष नागेश पवार, शहरप्रमुख सुरेश पवार, दिपक हरिभाऊ उतेकर, समीर शेठ, डॉ. संजय शेठ, महिला सभापती अस्मिता पवार, नगरसेवक प्रसाद इंगवले व शिल्पा दरेकर आदी उपस्थित होते.

शहरातील विविध प्रभागांमध्ये भाजप नेते प्रसन्ना पालांडे, अर्थ व नियोजन सभापती अंकिता निकम, शहरअध्यक्ष राजाभाऊ दिक्षित, रचना धुमाळ, कलिका अधिकारी, राजू धुमाळ, तनुजा भागवत, सपना बुटाला, मोरे मॅडम, गणेश शेठ, अमित तलाठी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित खेडेकर, आरडे, तसेच शिवसेनेच्या नगरसेविका स्नेहल मेहता, नगरसेवक विनायक दिक्षित, माजी उपनगराध्यक्ष सिद्धेश शेठ, सचिन मेहता, मनोज प्रजापती, बाबा सलागरे, हर्ष धारिया तसेच अनेक शिवसैनिक महिला पुरूष कार्यकर्ते रोज संध्याकाळी मतदार जनतेच्या भेटीगाठी घेऊन आमदार भरत गोगावले यांना मतदान करण्याचे आवाहन करीत आहेत.





# मुरूडमध्ये भातकापणी ८० टक्के पूर्ण

## आता कडधान्य पेरणीसाठी शेतकऱ्यांची तयारी

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील भातकापणीची कामे ८० टक्के पूर्ण झाली आहेत. नवीन पिढीला शेतीमध्ये आवड नसल्याने सुमारे २० टक्के भातक्षेत्र पडीक असल्याची स्थिती आहे.

तालुक्यात ३२०० हेक्टर क्षेत्र भातपिकाखाली आहे. यंदा शेतकऱ्यांनी सुमारे ३००० हेक्टर क्षेत्रात सुवर्णा, रूपाली, शुभांगी, कर्जत, चिंटू, साई, जया आदींसह पिकांची लागवड केली होती, तर सुधारीत वाण २०० हेक्टर क्षेत्रामध्ये लागवड केली आहे. या वर्षी वरूणराजाच्या कृपादृष्टीमुळे ३००० मिमीपेक्षा अधिक पर्जन्याची नोंद झाली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पीक बहरल्याने बळीराजा आनंदात आहे. शेतकरी वर्गाकडून भातकापणीला वेग आला असून सुमारे ८० टक्के कापणी पूर्ण झाली आहे.

शेतकरी आर्थिक अडचणीत असल्याने भातपिकाची झोडणी करून शासनातर्फे सुरू केलेल्या भातपिक खरेदी केंद्रावर भात घालण्याच्या तयारीत असल्याचे चित्र आहे. झोडणीच्या कामांना सुरुवात करण्यात आली. उष्णतेचा पारा वाढला असला तरीही झोडणी करणारी विशिष्ट पुरुष मंडळी सरसावली असून मजुरीही वाढली आहे.

काही ठिकाणी कडधान्यासाठी जमीन नांगरणी सुरू असून कडवे वाल, चवळी, मूग आदी कडधान्य पेरणीसाठी व्यस्त आहेत. उखारु जमिनीवरील हळव्या भाताची कापणी, झोडणीचे काम पूर्ण झाले आहे तर खारपट्ट्यातील गरवे भातकापणीला सुरुवात झाली आहे.



# माथेरान कड्यावरचा गणपती परिसरात बिबट्याचा वावर

**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान कड्यावरचा गणपती परिसरातील रेल्वे ट्रॅकवर बिबट्याचा वावर असल्याचा फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामुळे वन विभागानेही नागरिकांना खबरदारीचे आवाहन केले आहे.

या व्हायरल फोटोची पुष्टी होऊ शकलेली नाही, मात्र या भागात बिबट्याचे अस्तित्व असल्याचे स्थानिक सांगत आहेत. स्थानिकांच्या गोठ्यातील बकऱ्या, शेळ्या अर्धवट खाल्याचे दिसून आले असून त्या ठिकाणी बिबट्याच्या पायाचे ठसेही आढळले होते. वन विभागानेदही या परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे सांगितले नागरिकांनी, पर्यटकांनी खबरदारीचे आवाहन केले आहे.


**पनवेल महानगरपालिका**

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री. सिताराम हुद्दार, प्लॉट नं. बी. ५१, बी-५२, सेक्टर नं. ०४, आसुडगाव, ता. पनवेल, जि. रायगड | ०२ बदाम, ०२ जांभुळ व ०१ शेवगा अशी एकूण ५ झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. ३९ बी, सेक्टर नं.५, खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड येथील ०५ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/उद्यान/२१२४/प्र.क्र.७९/७६८/२०२४
दिनांक : १२/११/२०२४

**सही/-**
**(स्वरुप खारगे)**
सहा आयुक्त (वृक्ष प्राधिकरण)
पनवेल महानगरपालिका



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - सांगडे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| भुमापन नं. /हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ५२/१ | ०-०९-०० | १.७५ | कै. सुलभा रजनिकांत पतंगे यांचे वारस रेषा संतोष पतंगे श्री. संतोष श्रीरंग चंदन |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. १२/११/२०२४.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. : ९९३०३६९८६१

# तळोजातून नायजेरियन नागरिक जेरबंद

## आठ वर्षांपासून बेकायदेशीर वास्तव्य; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पासपोर्ट आणि व्हिजाची मुदत संपल्यानंतरदेखील तळोजा भागात मागील आठ वर्षांपासून बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या अमॉक इके जॉर्ज (वय ४८) या नायजेरीयन नागरिकाला अमंली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली तसेच या नायजेरीयन नागरिकाची माहिती पोलिसांना न देता, त्याला राहण्यासाठी फ्लॅट देणाऱ्या फ्लॅट मालकिणीविरोधातदेखील पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे या नायजेरीयन नागरिकाने भारतीय महिलेसोबत विवाहदेखील केल्याचे उघडकीस आली आहे.



तळोजा, फेज-२ भागामध्ये राहणाऱ्या एका नायजेरीयन नागरिकाने राहत्या घरामध्ये अंमली पदार्थाची साठवणूक करुन ठेवल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश धुमाळ, श्रीकांत नायडू, अलका पाटील आणि त्यांच्या पथकाने तळोजा, सेक्टर-२३ मधील द्विशा हाईटस् या इमारतीतील ११ व्या मजल्यावरील फ्लॅटवर छापा मारला.

या वेळी घरामध्ये अमॉक इके जॉर्ज (वय ४८) आणि मेरी नग्बकर (वय ४४) असे दोघे नायजेरीयन नागरिक आढळून आले. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने सदर घराची झडती घेतली असता, या घरातील बेडरुममध्ये एका बॉक्समध्ये दारुच्या सहा बॉटल्स आढळून आल्या. अंमली पदार्थ विरोधी पथकाने या दारुच्या बाटल्या जप्त करून दोघांकडे पासपोर्ट आणि व्हिसा बाबत चौकशी केली असता, मेरी नग्बकर हिचा पासपोर्ट वैध असल्याचे आढळून आले, मात्र अमॉस इके जॉर्ज याच्या पासपोर्टची वैधता २०१७ मध्ये संपल्याचे आढळून आले. तसेच त्याने सी फॉर्म देखील भरला नसल्याचे आढळून आले.

अधिक चौकशीत अमॉस इके जॉर्ज आणि त्याची पत्नी देवी प्रकाश आंबेरकर या दोघांनी तो राहत असलेला फ्लॅट पम्मी श्रीवास्तव या महिलेकडून भाड्याने घेतल्याचे आढळून आले तसेच अमॉस जॉर्ज याच्या पत्नीने करारनामा केला असल्याचे तसेच सी फॉर्म भरला नसल्याचे तपासात आढळून आले. यावरून अमॉस इके जॉर्ज याच्या पासपोर्ट आणि व्हिसाची मुदत संपलेली असताना तो बेकायदेशीररित्या राहत असल्याचे आढळून आले. तसेच नायजेरीयन नागरिक फ्लॅटमध्ये राहण्यास आल्यानंतर त्याचे आगमन आणि निर्गमन याची माहिती घर मालकाने पोलिसांना देणे आवश्यक असताना, रुमची मालकीण पम्मी श्रीवास्तव हिने सी-फॉर्म भरला नसल्याचे आढळून आले. त्यामुळे अंमली पदार्थ विरोधी पथकाने बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेला नायजेरीयन नागरिक आणि त्याला राहण्यासाठी भाड्याने फ्लॅट देणारी घर मालकीण या दोघांविरोधात परदेशी नागरिक कायदा तसेच रजिस्ट्रेशन ऑफ फॉरेनर्स ॲक्टनुसार गुन्हा दाखल करुन नायजेरीयन नागरिकाला अटक केली आहे.

नायजेरीन नागरिकाने दारू बाळगण्याचा परवाना नसतानाही त्याने व्हिस्की आणि स्कॉच या दारूची साठवणूक करून ठेवल्याने त्याच्या विरोधात महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमानुसारदेखील कारवाई करण्यात आली आहे.

# आमदार महेश बालदी यांच्या प्रचाराचा उरणमध्ये झंझावात

**उरण : प्रतिनिधी**

उरण विधानसभा मतदार संघातील चिरनेर, कळंबूसरे, मोठीजुई, कोप्रोली, खोपटे, पाणदिवे, पिरकोन, सारडे, वशेणी, पुनाडे, पाले, आवरे आणि गोवठणे उरण पूर्व विभागात आमदार महेश बालदी यांच्या प्रचार रॅलीला भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



उरणचे आमदार महेश बालदी यांनी स्वतःच्या मतदार संघातील उरण पूर्व विभागातील गावागावात विविध प्रकारची विकास कामे केली असून, त्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात भाजपचे पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्ते त्यांच्या प्रचार रॅलीत सहभागी झाले होते.

बालदी यांच्या प्रचार रॅलीचे वैशिष्ट्य म्हणजे आमदार महेश बालदी हे स्वतः रॅलीसाठी उपस्थित नसतांनाही भाजपाचे पूर्व विभागातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रचाराची धुरा हातात घेऊन ज्येष्ठांसह वयोवृद्ध महिला तरुण आणि लाडक्या बहिणींना आमदारांच्या मागील पाच वर्षाच्या कामांचे प्रगती पुस्तक दाखवित एकदिलाने प्रचार करीत असल्याचे चित्र काल सर्वत्र दिसत होते. भाजपच्या विकासाचे व्हिजन पाहूनच मतदान करा, असे आवाहन येथील भाजपचे नामांकित उद्योगपती राजेंद्र खारपाटील यांनी केले गावागावातील तमाम मतदारांना केले.

भाजपच्या कमळ निशाणीचे बटण दाबून येत्या २० नोव्हेंबरला उरण मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार उरणचे दमदार आमदार महेश बालदी यांना आपले बहुमूल्य मतदान करून विकासाला मत द्या. प्रगतीला साथ द्या. हमारा नेता कैसा हो, महेश बालदी जैसा हो, महेश बालदी आगे बढो, हम तुम्हारे साथ हो. अशा घोषणाबाजी करीत भाजप कार्यकर्त्यांनी परिसरात दणाणून सोडला होता.

या प्रचार रॅलीत माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, शशिकांत पाटील, प्रदीप ठाकूर, सुशांत पाटील, भाजप युवा नेते प्रतिक गोंधळी, ग्रामपंचायतीचे सदस्य समीर डुंगीकर, माजी सदस्य रमेश फोफेरकर, जयेश खारपाटील, मुकुंद गावंड, देवेंद्र पाटील, कुलदीप नाईक, राजेश पाटील व रुपेश पाटील यांच्यासह भाजपचे विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## टँकरला धडकून दुचाकीस्वार ठार

**नवी मुंबई : बातमीदार**

रस्त्यालगत उभ्या टँकरला दुचाकीची धडक लागून भीषण अपघात झाल्याची घटना ठाणे-बेलापूर मार्गावर घडली आहे. यामध्ये गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा मृत्यू झाला असून, मागे बसलेली तरुणी जखमी झाली आहे.

या प्रकरणी टँकरचालक इंद्रजीत यादव (वय ४१) याच्यावर रबाळे एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. दिघा परिसरात राहणारा राहुल पाटील (वय २५) हा त्याच्या मोटरसायकलवरून मैत्रिणीला चेंबूर येथे सोडण्यासाठी चालला होता.

या वेळी टँकरचा अंदाज न आल्याने त्याची मोटरसायकल टँकरला धडकली. जखमींना रुग्णालयात दाखल नेले असता राहुल याला डॉक्टरांनी मृत घोषित केले, तर मैत्रिणीवर उपचार सुरू आहेत.

## उमेदवारांच्या तपासणीची पहिली बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघ १८८ निवडणूक २०२४ अंतर्गत सर्व उमेदवारांनी निवडणुकीच्या प्रचार व इतर बाबींसाठी केलेल्या खर्चाची तपासणी करण्यासाठीची पहिली बैठक रविवारी (दि.१०) पनवेल महानगरपालिका, सभागृह, दुसरा मजला पनवेल, रायगड येथे आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीसाठी खर्च निरीक्षक रमेश कुमार (आयआरएस) आणि पवन चांडक, निवडणूक निर्णय अधिकारी, मंगेश गावडे व निलेश नलावडे नोडल अधिकारी (खर्च) यांच्या मार्गदर्शनाखाली व संग्राम व्होरकाटे, खर्च पथक प्रमुख, संजय आपटे, सहाय्यक खर्च निरीक्षक व विजय फासे सहाय्यक खर्च निरीक्षक व खर्च सनियंत्रण पथकातील सर्व सदस्य उपस्थित होते.

या बैठकीला सर्व १३ उमेदवार खर्च प्रतिनिधी उपस्थित होते. प्रशासनाने केलेली व्यवस्था आणि उमेदवार खर्च प्रतिनिधींनी केलेल्या सहकार्यामुळे ही तपासणी सुरळीत झाली.







पनवेल : येथील कन्नड समाजाच्या प्रमुख व्यक्तींसोबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी बैठक घेतली. यामध्ये त्यांनी समाजाच्या अडीअडचणी जाणून घेत त्या सोडविण्यासाठी भाजप कटीबद्ध असल्याची ग्वाही दिली.

## सातवी अपोलो कॅन्सर परिषद; २०००हून अधिक तज्ज्ञांचा सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार, पनवेल : वार्ताहर**

अपोलो कॅन्सर सेंटर, मुंबईने आयोजित केलेल्या अपोलो कॅन्सर परिषदेच्या सातवी आवृत्तीला सुरुवात झाली. आघाडीच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांमधील ४०० हुन जास्त फॅकल्टी, कॅन्सर देखभाल तज्ञ आणि संशोधकांसहित २००० हुन जास्त ऑन्कोलॉजिस्ट यामध्ये भाग घेत आहेत.

नुकतीच ८ ते १० नोव्हेंबरदरम्यान सुरू करण्यात आलेली ही परिषद आरोग्य देखभाल क्षेत्रातील प्रोफेशनल्ससाठी पॅनल चर्चा, कार्यशाळा आणि संशोधन सादरीकरणामध्ये भाग घेण्यासाठी एक प्रभावी मंच आहे.

यामध्ये मुख्य भाषण आणि इतर अनेक सत्रांमध्ये कॅन्सर देखभालीच्या उपचारांविषयी तसेच व्यवस्थापन धोरणांविषयी महत्त्वाची माहिती दिली जाते.

डॉ. एलिसाबेत वीडरपास, संचालिका, जागतिक आरोग्य संघटनेमध्ये इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सर यांनी सांगितले, आयएआरसी च्या २०२२ च्या अनुमानांवरून समजते की, जगभरात कॅन्सरचे प्रमाण वाढत आहे, २०२२ मध्ये नवीन केसेस २० मिलियन होत्या, त्या २०५० मध्ये वाढून ३५ मिलियनपर्यंत पोहोचतील. भारतामध्ये २०२२ मध्ये कॅन्सरच्या १.४१ मिलियन नवीन केसेस आढळून आल्या होत्या, यामध्ये २०५० पर्यंत २.६९ मिलियनपर्यंत वाढ होईल असे वाटते. हे अनुमान खूपच भयावह आहे, आणि म्हणूनच कॅन्सरची महामारी रोखण्यासाठी महत्त्वाचे हत्यार आहे आजाराला प्रतिबंध घालणे. कॅन्सरला रोखणे काळाची गरज बनली आहे. अपोलो कॅन्सर कॉन्क्लेव २०२४ सारखे उपक्रम तज्ञांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रभावी मंच बनतात.

# गव्हाण विद्यालयात राष्ट्रीय शिक्षण दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये राष्ट्रीय शिक्षण दिनाचे औचित्याने देशाचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांच्या शुभहस्ते मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे तसेच प्रशांत परदेशी, शीतलकुमार म्हात्रे, क्रीडाशिक्षक पारखे, सोनल घरत, ज्योत्स्ना कोळी, दर्शना भोईर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

इयत्ता सहावी अ या वर्गाच्या वतीने हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर. पाटील मॅडम व सहावी अ चे वर्गशिक्षक प्रशांत परदेशी यांचे विशेष सहकार्य लाभले.

## फ्लॅशमॉबद्वारे मतदानाचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मतदारसंघ १८८मध्ये मतदानाची टक्केवारी वाढवी, नागरिकांरी मोठ्या संख्येने आपला मतदानाचा अधिकार बजावावा याकरिता पनवेल महापालिकेच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे.



आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार नुकताच पनवेल रेल्वे स्थानक, पनवेल बसस्थानक, ओरयन मॉल येथे फ्लॅशमॉबद्वारे मतदान जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

स्वीप प्रमुख मा. शहर अभियंता संजय कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अभियंता गजानन देशमुख, अभियंता प्रसाद परब, महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभेची सार्वत्रिक निवडणुक होणार असून या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांची (सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्रॅम) अमंलबजावणी पनवेल विधानसभा मतदारसंघ अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात केली जात आहे. स्वीप कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या.

या कार्यक्रमांतर्गत नुकताच पनवेल रेल्वे स्थानक, पनवेल बस स्थानक, ओरायन मॉल येथे फ्लॅशमॉबद्वारे तरुणांनी मतदान जनजागृती केली तसेच आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणाऱ्या विविध कार्यक्रमांवेळी आयुक्त मंगेश चितळे यांची नागरिकांना मोठ्या संख्येने मतदान करण्यासाठीच्या आवाहनाची क्लिप वाजविण्यात येत आहे.

प्रभातफेरी, बाईक रॅली, सायकल रॅली काढणे, बचत गटातील महिलांची बैठक व रॅली, स्वाक्षरी मोहीम, सेल्फी पॉईंट असे विविध कार्यक्रम राबविले जात आहे.

## उरणमध्ये 'स्विप' अंतर्गत मतदार जागृती

**उरण :** ज्येष्ठ नागरिक मॉर्निंग कट्टा उरण व एस.टी डेपो उरण या ठिकाणी मतदार जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.

या वेळी केंद्र प्रमुख निर्मला घरत, केंद्र प्रमुख बबन पाटील, समता ठाकूर, संजय होळकर, संजय पाटील, संगिता गावंड यांनी मतदानाचे महत्त्व पटवून दिले. प्रकाश पाटील यांनी सर्वांचे स्वागत केले. संजय होळकर यांनी स्विपतर्फे स्वागत केले तर बबन पाटील यांनी मतदानाचे महत्त्व सांगितले.

या वेळी कुलकर्णी सर, दर्णे, प्रकाश पाटील यांनी आपली मते मांडली, निर्मला घरत यांनी माहिती दिली तर समता ठाकूर यांनी आभार मानले. या वेळी आनंद बुधे, नितीन पडते, दिनेश घरत आदी मंडळी उपस्थित होती. मी मतदान करणार या बोर्ड वर सह्या करण्यात आले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



## गडकिल्ले व रांगोळी स्पर्धेला प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

महाराष्ट्राचे इतिहासाचे साक्षीदार असलेल्या गडकिल्यांची सर्वांना ओळख व्हावी, गडकिल्लेच्या माध्यमातून महाराष्ट्राचा इतिहास सर्वांना ज्ञात व्हावा, गड किल्ल्यांचे जतन व्हावे, संरक्षण संवर्धन व्हावे या दृष्टीकोणातून गड किल्ले स्पर्धाचे तसेच रांगोळी कलेविषयी जनजागृती व्हावी, नवनवीन कलाकार तयार व्हावेत. हे कलाकार राष्ट्रीय पातळीवर चमकावेत या दृष्टीकोणातून रांगोळी स्पर्धेचे आयोजन युवा संघटना सोनारीच्या माध्यमातून श्री सिद्धिविनायक मंदिर, सोनारी, उरण तालुका येथे आयोजित करण्यात आले होते. या स्पर्धे ला जनतेचा, नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे.



स्पर्धेतील विजेत्या उमेदवारांना बक्षीस, सन्मान चिन्हे, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर सत्या कडू, राकेश नरेश कडू, दीपक चिंतामण कडू, सुरेश कडू, हितेश कडू, अंकुश तांडेल, प्रशांत कडू आदी उपस्थित होते. युवा संघटना सोनारी तर्फे आयोजित केलेल्या गडकिल्ले स्पर्धेत प्रथम क्रमांक आई मातोश्री ग्रुप सोनारी, द्वितीय क्रमांक लव्या म्हात्रे, कृपा म्हात्रे, मनन म्हात्रे यांनी तर तृतीय क्रमांक जय शिवराय ग्रुप सोनारी यांनी पटकविला तसेच रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक काशिश कडू, द्वितीय क्रमांक स्मिता भोईर, तृतीय क्रमांक वांशिका तांडेल यांनी पटकाविले.

कार्यक्रमासाठी युवा संघटना सोनारी व राकेश कडू मित्र परिवाराच्या सर्व पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. युवा संघटना सोनारी यांनी या स्पर्धेच्या माध्यमातून समाजामध्ये एक संदेशदेखील दिलेला आहे आपली संस्कृती परंपरा गड किल्ले त्यांचा इतिहास यांची माहिती व त्यांचा जतन संवर्धन येणारा पिढी कडून व्हावे हाच स्पर्धेच्या माध्यमातून संदेश देण्यात आला.युवा संघटना सोनारी यांच्या संकल्पनेतून पहिल्यांदाच या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याला जनतेचाही उत्तम प्रतिसाद लाभला. स्पर्धकांनी, नागरिकांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

## चेक बाऊन्स प्रकरणात कारावास

**नवी मुंबई : बातमीदार**

येथील बल्लाळेश्वर सहकारी पतपेढी मर्या. नवी मुंबई शाखा जुन्नर यांच्याकडून कर्जदार बबन रामा लोखंडे यांनी कर्ज घेतले होते. या कर्जाच्या परतफेडी पोटी पतसंस्थेला दिलेला तीन लाख ९४ हजार रुपयांचा चेक न वटल्याने पतसंस्थेने त्यांचेवर रितसर मुख्य महानगर न्यादंडाधिकारी न्यायालय माझगाव येथे दाद मागितली होती. चौकशी अंती आरोपी बबन रामा लोखंडे यांनी गुन्हा केल्याचे सिध्द झाले. मुंबई माझगाव येथील मुख्य महानगर न्यादंडाधिकाऱ्यांनी आरोपीस तीन महिने कारावासाची शिक्षा ठोठावली.

## ब्रह्मचैतन्य संगीत सभेत सागर कुलकर्णी यांचे गायन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ३६वे पुष्प संपन्न झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात झालेल्या या कार्यक्रमात नाशिक येथील युवा गायक सागर कुलकर्णी यांची गायनसेवा झाली.



कुलकर्णी यांनी आपल्या संगीत सभेची सुरुवात 'पुरीया कल्याण' या रागाने केली. त्यानंतर त्यांनी 'तुने मोहा श्याम हमारा बैर ना कैसा जादू डाला' ही पहाडी ठुमरी सादर केली. यानंतर 'सुरत पिया' हे प्रसिद्ध नाट्यपद सादर केले. त्यानंतर आपले गुरू पं. शंकरराव वैरागकर यांनी भिमपलास रागात बांधलेली 'घेई घेई माझे वाचे' ही अभंगरचना सादर केली. व 'स्वामी कृपा कधी करणार' आणि 'आम्ही ज्याचे दास' या भैरवीने त्यानी संगीत सभेची सांगता केली.

या संगीत सभेला नंदकुमार कर्वे यांनी संवादिनीसाथ केली. तर संगीत कुलकर्णी व कौस्तुभ भाग्यवंत यानी तबलासाथ केली. समीर सोमण यानी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. केंद्रातील कार्यकर्ते आणि आयोजकानी ही संगीतसभा यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

# नागोठण्याच्या विकासासाठी भरघोस मताधिक्याने निवडून द्या

## आमदार रविशेठ पाटील यांचे नागरिकांना आवाहन

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे शहर व विभागातील जनता माझे कुटुंब असून नागोठण्यातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचे माझ्यावर प्रेम आहे. नागोठण्यातील विकासासाठी मी कधीही भेदभाव न करता भरघोस निधी दिला आहे आणि यापुढेही निधीची कमतरता भासू देणार नाही. नागोठणे जिल्हा परिषद मतदारसंघात लोकसभेला आपण जे मताधिक्य घेतले आहे त्याच्या दुपटीने आपल्याला विधानसभा निवडणुकीत मताधिक्य घ्यायचे आहे. ही माझी शेवटची निवडणूक आहे. त्यामुळे मला भरघोस मतांनी निवडून द्या, असे आवाहन पेण-सुधागड विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या वतीने भाजपचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांनी नागोठणेकरांना केले.




आमदार रविशेठ पाटील यांच्या नागोठणे येथील संपर्क कार्यालयात सोमवारी (दि.११) महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांना, बूथ अध्यक्षांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर राष्ट्रवादीचे नेते दिलीप टके यांच्या निवासस्थानी आमदार रविशेठ पाटील यांनी सदिच्छा भेट दिली व प्रमुख कार्यकर्त्यांशी सविस्तर चर्चा केली.

या वेळी राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, भाजप नेते मारुती देवरे, शहराध्यक्ष सचिन मोदी, राष्ट्रवादीचे नेते हरीश काळे, विलास चौलकर, प्रकाश जैन, राष्ट्रवादी नागोठणे शहराध्यक्ष बाळासाहेब टके, जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, तालुका सरचिटणीस आनंद लाड, राष्ट्रवादी युवा नेते प्रथमेश काळे, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष अपर्णा सुटे, राष्ट्रवादीचे नेते कृष्णा धामणे, शिवसेना नेते मनोज खांडेकर, भाजप नेते सिराज पानसरे, शेखर गोळे, बिपीन सोष्टे, दिलीप शहासने, मनोज टके, भारत भोय, शंकर भालेकर, शिवसेना विभाग अध्यक्ष प्रवीण ताडकर, शहरप्रमुख संतोष चितळकर, उमेर सांगडे, कोंडीराम आखाडे, संजय कणघरे, विवेक रावकर, तिरत पोलसानी, तात्या पोत्रिक, वसिम बोडेरे, अमित खांबकर, अॅड. रमेश जाधव, गौतम जैन, घनश्याम ताडकर, नामदेव ताडकर, प्रियांका पिंपळे, शितल नांगरे, मुग्धा गडकरी आदींसह बहुसंख्येने महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नागोठणेचे माजी सरपंच राष्ट्रवादीचे नेते विलास चौलकर यांनी केले.

# विकटगडावरून वाट चुकलेल्या तरुणाची सुटका

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानजवळील विकटगडावर जालना येथून आलेला तरुण वाट चुकला होता. नेरळ फणसवाडी येथील शिवगर्जना ग्रुपच्या सदस्यांकडून या तरुणाची सुखरूप सुटका करण्यात आली आहे.



जालना येथे राहणारा हा तरुण एकटाच माथेरान विकटगड येथे ट्रेकिंगसाठी आला होता, मात्र घनदाट जंगलातून परतत असताना वाट हरवल्याने गडावर रात्री अडकून पडला. ही माहिती नेरळ पोलिसांना मिळताच पोलिसांनी स्थानिक फणसवाडी येथील शिवगर्जना ग्रुपला पाचारण केले.

जालना जिल्ह्यातील तरुण शनिवारी (दि.९) नेरळ येथून माथेरानजवळील विकटगडावर जाण्यासाठी सकाळी आला होता. गडाबाबत माहिती नसतानादेखील हा तरुण ट्रेकर्स एकटाच स्थानिक ग्रामस्थांकडून माहिती घेत गडावर पोहचला. येथील निसर्ग सौंदर्य न्याहाळत पर्यटक ट्रेकर्स निसर्गाचा आनंद लुटत आहेत, परंतु हा तरुण परतीच्या प्रवासात पायवाट हरवून बसला. त्यामुळे घरी जाण्यासाठी हा तरुण मार्ग शोधत असताना घनदाट जंगलात अडकला.

दरम्यान तरुणाने पोलीस हेल्पलाईन नंबरवरून पोलिसांची मदत मिळवण्याचा प्रयत्न केला. नेरळ पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे आणि त्यांचे पोलीस पथक विकटगडाच्या पायथ्याला असणाऱ्या फणसवाडी गावात पोहचले.

स्थानिक शिवगर्जना ग्रुपमधील तरुणांच्या मदतीने नेरळ पोलिसांनी तरुणाचा शोध घेतला. या तरुणाला रात्री १२ वा. सुखरूप गडाखाली आणण्यात आले. यासाठी शिवगर्जना टीमचे सुरेश निरगुडा, हेमंत निरगुडा, रवि आगिवले, आकाश निरगुडा, हरी दोरे, राम दरवडा, दिपक यांनी उत्तम कामगिरी केली.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर ट्रेलरची तीन वाहनांना धडक

## चालकाचा जागीच मृत्यू; एक जखमी




**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर मंगळवारी (दि.१२) सकाळी एका ट्रेलरने पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या कंटेनर, टेम्पो, ट्रेलर या तीन वाहनांना जोरदार धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात ट्रेलर चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे, तर एक जण जखमी झाला.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरून पुण्याहून मुंबईकडे ट्रेलर (एचआर ३९ ई ५२०३) हा जात असताना तो बोरघाटात ढेकूजवळ आला असता त्याचे ब्रेक फेल झाल्याने चालकाचे नियंत्रण सुटून ट्रेलरने पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या कंटेनर (एमएच ४६ बीएम११०६)ला पाठीमागून जोरदार धडक दिली.

यामुळे कंटेनर पुढे असणाऱ्या टेम्पो (डीडी ०३ पी २९८९) आणि ट्रेलर (एमएच १२ व्हिटी२९८९) यांना धडकून अपघात झाला. यात ट्रेलरचालक पवन कुमार याला गंभीर दुखापत होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला तर एक जण किरकोळ जखमी झाला आहे.

या अपघाताची माहिती मिळताच खोपोली पोलीस, बोरघाट पोलीस, आयआरबी टीम देवदूत टीम, अपघातग्रस्त टीमचे सदस्य सदस्य तत्काळ घटनास्थळी दाखल होत ट्रेलरमध्ये अडकेलेल्या चालकाला बाहेर काढले. अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या सहाय्याने बाजूला घेण्यात आली.

# सह्याद्री प्रतिष्ठानकडून रेवदंडा किल्ल्याची स्वच्छता

**अलिबाग : प्रतिनिधी**

रेवदंडा येथे सह्याद्री प्रतिष्ठान अलिबाग विभागाच्या मावळ्यांनी रविवारी (दि.१०) पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली किल्यावर स्वच्छता मोहीम राबविली. या मोहिमेत किल्ल्यावरील झाडेझुडपे साफ करण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत २५ ते ३० दुर्गसेवकांनी सहभाग नोंदविला.

पुढेही असेच स्वच्छता मोहीमा घेऊन साफसफाई करण्याचे ठरविले आहे. ज्यामुळे किल्ला पर्यटकांसाठी नक्कीच पर्वणी ठरतील असे सहयाद्री प्रतिष्ठान अलिबाग विभागाचे मोहीमप्रमुख आकाश चिमणे यांनी सांगितले. या वेळी अध्यक्ष जितेंद्र म्हात्रे, उपअध्यक्ष सन्मेश नाईक, रक्षित पाटील, तेजस वर्तक, मनोज पारकर, हृषिकेश शिंदे, प्रथमेश धसाडे, स्वप्नील भांजी, प्रशांत भोईर, जयेंद्र भोईर, आकाश चिमणे, सिद्धार्थ पाटील, सचिन सुर्वे, गौरव सुर्वे, अपूर्वा, श्रुती वारगे, वैदेही सुर्वे, मेघा पाटील, ओंकार पाटील, विहार ठाकूर, श्रेयश घरत मोहिमेसाठी उपस्थित होते.



# जनता महायुतीला कौल देईल -खासदार सुनील तटकरे

**मुरूड : प्रतिनिधी**

आगामी काळात महायुतीचे सरकार येणार असून तेव्हा लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचा निर्णय होणार आहे. आम्ही सुरू केलेली योजना कधीही बंद होणार नाही. याउलट योजना सुरू ठेऊन विकासाची कामेही आम्ही जलद गतीने पूर्ण केली आहेत. त्यामुळे राज्यातील जनता महायुतीला कौल देईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेमध्ये केले आहे.



या वेळी त्यांच्यासमवेत अलिबाग-मुरूड मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र दळवी, राष्ट्रवादी नेते मनोज भगत, अतिक खातीब, मुरूड तालुकाध्यक्ष फैरोज घलटे, हसमुख जैन, अजित कासार, राजपुरी उपसरपंच इस्माईल सिद्दिक आदी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा हा फसवा असून त्याला येथील मतदार फसणार नाहीत. महालक्ष्मी योजना हे दुटप्पीपणाचे लक्षण असून आम्ही योजना सुरू केल्यानंतर त्यांना शहाणपण येत आहे. महायुतीने विविध लोकाभिमुख योजना राबवत असताना विकासाचा रेपो नेहमी उंचीवर नेऊन ठेवला. केंद्र सरकारने महाराष्ट्रात येणारे उद्योग गुजरातला पळवले ही विरोधकांची बोंब धादांत खोटी असून महाराष्ट्रामध्ये मोठमोठे उद्योग येत असून सुमारे दोन लाख युवकांना रोजगार उपलब्ध होणारे कारखाने येत असून लवकरच कार्यान्वित होणार आहेत, असा दावा केला.

# आळंदी पायी वारी दिंडीला सुरुवात

## हजारो वारकऱ्यांचे हरिनामाच्या गजरात प्रस्थान



**चौक : प्रतिनिधी**

कार्तिकी एकादशी निमित्ताने देवाची आळंदीकडे टाळ-मृदंगाच्या गजरात, विठू नामाचा जयघोष करीत वारकरी यांचे प्रस्थान झाले आहे. चौक परिसरातून दिंड्या निघाल्या आहेत.

पंढरपूरची आषाढी एकादशीनंतर कार्तिकी एकादशी मोठी एकादशी म्हणून ओळखली जाते. हा दिवस चातुर्मास व्रताचा हा शेवटचा दिवस मानला जातो. या दिवशी भगवान विष्णू त्यांच्या चातुर्मासातल्या चार महिन्यांच्या योगनिद्रेतून जागे होतात, अशी धारणा आहे. त्यामुळे हिला देवोत्थनी, देवउठी एकादशी असेही म्हणतात.

तुळशी विवाहाची सुरुवात होते ती याच दिवसापासून. कार्तिक पौर्णिमेला तुळशी विवाहाची सांगता होते आणि लग्नसराईचे दिवस सुरू होता. पंढरीच्या विठुरायाचे स्मरण करण्याचा, त्याच्या नावाने उपवास करण्याचा हा दिवस मानला जातो. चौक परिसरातून निघालेल्या वारकरी दिंडीला निरोप देण्यासाठी वारकरी पंथाला जोपासणारा भक्त उपस्थित होतो. महिलांनी डोक्यावर तुळस घेतली होती,तर काहींच्या डोक्यावर ज्ञानेश्वरी अध्याय होतो.

टाळ-मृदुंगाच्या गजरात विठू नामाचा जयघोष करीत या दिंड्यांनी प्रस्थान केले. कार्तिकी एकादशीपासून खोपोली साजगाव येथे बोंबल्या विठोबाची १५ दिवसांची जत्रा भरते.

# टपाली मतदान



**अलिबाग : विधानसभा निवडणूक यंत्रणेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सोमवारी टपाली मतदान घेण्यात आले. आरसीएफ वसाहतीत असलेल्या शाळेत विधानसभा मतदानसंघाप्रमाणे पाच टपाली मतदान केंद्र तयार करण्यात आली होती.**

# पावणेदोन लाखांचा गांजा जप्त

## पेण पोलिसांची कारवाई; आरोपी अटकेत

**पेण** : विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता लागू आहे. त्यामुळे अवैधरित्या सुरू असलेल्या धंद्यांवर पोलीस लक्ष ठेऊन आहेत. पेणमध्ये अशाचप्रकारे पोलिसांनी एका तरुणाकडून सुमारे पावणेदोन लाखांचा गांजा जप्त केला असून त्याला ताब्यात घेतले आहे.

पेण पोलीस ठाणे येथील पोलीस नाईक राकेश पवार यांना रविवारी (दि.१०) त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत सुशील राजाराम जोशी (वय ३८, रा.नवीन वसाहत, फणसडोगरी पेण), हा गांजाची विक्री करण्यासाठी म्हाडा कॉलनीत येणार असल्याची माहिती मिळाली. पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी तत्काळ उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे यांच्या आदेशाने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. दोन टिम तयार करून म्हाडा कॅालनी रिंग रोड येथे सापळा लावण्यात आला. सुशील जोशी हा त्यांच्या स्कुटीवरून जात असतांना त्यास एक टिमने थांबविण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने स्कुटीचा स्पिड वाढवून तो पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना दुसऱ्या टिमने त्यास जागीच थांबविले. त्याच्याकडून एक लाख ७५ हजार ८४० रुपये किमताचा गांजा व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सुनील जोशी याला ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश राजपुत हे करीत आहेत.

# कार्तिक पौर्णिमेच्या उत्सवासाठी गरुडध्वज सज्ज

**कर्जत : प्रतिनिधी**

देऊळवाडी किरवली येथील कार्तिक पौर्णिमेच्या उत्सवासाठी परंपरेनुसार डोलकाठीच्या टोकाला बांधण्यासाठी ढाक डोंगरावरील चढण्या-उतरण्यास अत्यंत कठीण असलेल्या भैरी मंदिरातून गरुडध्वज आणला.



गरुडध्वजाची पूजा सावळाराम बडेकर आणि हनुमंत गायकर यांच्या हस्ते देऊळवाडी येथील मंदिरात करण्यात आली. त्यानंतर श्री ग्रामदेवी बहिरी तळई संस्थान, देऊळवाडी किरवलीचे सचिव दिलीप बडेकर, पोलीस पाटील विवेक बडेकर, सावळाराम बेडकर, ज्ञानेश्वर जाधव, नरेंद्र शेलार, अनिल खंडागळे, नयन बडेकर, सुनील गायकवाड, सुनील अहिर, राज बेडकर, निखिल पन्हाळे, राजेश बडेकर, संकेत बडेकर, योगी बडेकर, सोहम बडेकर, सिरेंद्र रसाळ, सौरभ बडेकर, नितीन बडेकर, प्रकाश बडेकर, प्रशांत बडेकर, शामा बडेकर, राहुल बेडकर, पंकज गायकवाड, रोहिदास पाटील, सतीश ठोंबरे, मयूर ठाणगे, संजय काळभोर, जनार्दन बेडकर आदी गरुडध्वज आणण्यासाठी ढाक डोंगरावर गेले होते.

गरुडध्वज ढाक भैरी मंदिरात आणल्यानंतर गरुडध्वजाची पूजा कदम यांच्या मार्गदर्शनाखाली दिलीप बडेकर यांच्या हस्ते करून अभिषेक करण्यात आला. त्यानंतर हे सारे भाविक मार्गस्थ झाले. हा गरुडध्वज देऊळ वाडी येथे आणण्यात आला. त्या वेळी प्रकशबुवा बडेकर आणि प्रभाकर राऊत यांनी पूजा केली. हा ध्वज गुरुवारी (दि.१४) ढोलकाठीच्या तुऱ्यावर बांधण्यात येणार आहे. त्यांनतर शुक्रवारी (दि.१५) सकाळी ७.३० वा. ही डोलकाठी मंदिराजवळ उभी करण्यात येणार आहे.

कार्तिक पौर्णिमेला या डोलकाठीचा मोर पिसाऱ्याने शिवमंदिरातील शिवपिंडीला आरतीच्या वेळी वारा घालून ही ३० फुट उंचीची डोलकाठी हनुवटीवर, दातांवर, कपाळावर व हातावर ठेऊन नाचविण्यात येते. हे दृश्य फारच रोमांचकारक असते.

परंपरागत असलेली यात्रा उत्साहात होणार असून हार फुलांसह प्रसादाची व खेळण्यांची आदी दुकाने असणार आहेत. यंदा निवडणुकीची आचारसंहिता असल्याने रात्री १० वा.पर्यंत जत्रा असेल.

# जनतेने त्यांना काँग्रेस भवनची पायरी चढायला लावली

## बोर्ली येथील सभेत आमदार महेंद्र दळवींची जयंत पाटीलांवर टीका

**रेवदंडा : प्रतिनिधी**

माजी आमदार जयंत पाटील यांनी शपथ घेतली होती की, उभ्या आयुष्यात काँग्रेस भवनची पायरी चढणार नाही, मात्र आता जनतेने त्यांना काँग्रेस भवनची पायरी चढायला लावली, अशी टीका आमदार महेंद्र दळवी यांनी बोर्ली येथे महायुतीच्या उसरोलीतील आयोजित सभेत केली.



मुरूड तालुक्यातील बोर्ली येथे महायुतीची उसरोली जि.प.गणात सभेचे आयोजन रविवारी (दि. १०) करण्यात आले होते. या सभेस भाजप सरचिटणीस अॅड. महेश मोहिते, अजगर दळवी, मनोज भगत, स्मिता खेडेकर, शिवसेना जिल्हा उपाध्यक्ष भरतशेठ बेलोसे, शिवसेना नेते सी.एम.ठाकूर, जिल्हा नियोजन समिती सदस्य निलेश घाटवळ, माजी जि.प.सदस्य तांबे, उस्मान रोहेकर, बोर्ली सरपंच सपना जायपाटील, शिवसेना मुरूड तालुका प्रमुख ऋषीकांत डोंगरीकर, शिवसेना उपतालुका प्रमुख भगिरथ पाटील, भारत मोती, काकळघर सरपंच स्वस्तिक ठाकूर, मांडला माजी सरपंच सुचिता पालवणकर, विकी वेगस, जयेश म्हात्रे आणी बोर्ली शिवसेना, भाजप व आरपीआय आदी महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार महेंद्र दळवी पुढे म्हणाले की, माजी आमदार जयंत पाटील यांना प्रभाकर पाटील व दत्ता यांच्या वारसा लाभला आहे, म्हणून जयंत पाटील यांची ओळख. विधान परिषद निवडणुकीत मी शब्द दिला होता. अनेकांचे संसार त्यांनी उद्ध्वस्त केले आहे. मीसुद्धा कोळीवाड्यातला आहे. कोळी बांधवासाठी महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून महामंडळ तयार केले. कोळी व आगरी समाज एकच समाज आहे. एक समुद्रशेती करतो व एक भातशेती करतो. लोकांसमोर चुकीचे मांडून आता लोक त्यांच्या भूलथापांना भूलणार नाहीत, असे प्रत्युत्तर त्यांनी कोळी बांधवांबाबत केल्या जाणाऱ्या अपप्रचाराबाबत दिले.

# आयुष म्हात्रेने केले धोनीला प्रभावित | आयपीएल लिलावापूर्वी सीएसके घेणार ट्रायल

**मुंबई : प्रतिनिधी**

चेन्नई सुपर किंग्जने मुंबईचा १७ वर्षीय फलंदाज आयुष म्हात्रे याला आयपीएल लिलावापूर्वी ट्रायलसाठी बोलावले आहे. म्हात्रेने नुकतीच रणजी ट्रॉफीमध्ये चमकदार कामगिरी केली आहे, ज्यामध्ये त्याने शतकही झळकावले आहे. चेन्नईचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी आणि संघाचे स्काऊट्स म्हात्रेच्या कामगिरीने प्रभावित झाले आहेत.

वृत्तानुसार, आयुष म्हात्रेच्या या कामगिरीने सीएसकेला प्रभावित केले आहे. सीएसकेचे सीईओ कासी विश्वनाथन यांनी एमसीएचे सचिव अभय हडप यांना ई-मेल पाठवून म्हात्रेला ट्रायलसाठी परवानगी देण्याची विनंती केली आहे. ई-मेलमध्ये असे लिहिले आहे की, सीएसकेच्या निवड चाचण्या १७ ते २२ नोव्हेंबरदरम्यान सीएसकेएचपीसी नवलूर मैदान, चेन्नई येथे होणार आहेत. आम्ही एमसीएला आयुष म्हात्रेला ट्रायलसाठी भाग घेण्याची परवानगी देण्याची विनंती करतो.



### अशी आहे कामगिरी

आयुष म्हात्रेने यंदाच्या मोसमात मुंबईसाठी प्रथम श्रेणीत पदार्पण केले आहे. लखनऊमध्ये त्याने रेस्ट ऑफ इंडियाविरुद्ध इराणी चषकात पदार्पण केले. म्हात्रेने आतापर्यंत पाच प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ३५.६६च्या सरासरीने ३२१ धावा केल्या आहेत. त्याच्या नावावर एक शतक आणि एक अर्धशतकही आहे. रणजी ट्रॉफीमध्ये महाराष्ट्राविरुद्ध खेळताना म्हात्रेने १७६ धावांची शानदार खेळी केली. ही त्याची प्रथम श्रेणी क्रिकेटमधील सर्वोच्च धावसंख्या आहे.

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीसाठी मुंबईच्या संभाव्य संघात आयुष म्हात्रेचाही समावेश करण्यात आला आहे. ही स्पर्धा २३ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. रणजी करंडक आणि सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीच्या पाचव्या फेरीदरम्यान सहा दिवसांच्या विश्रांतीदरम्यान सीएसकेने आयुषला ट्रायलसाठी बोलावले आहे.

# राहुल म्हणतो, थोडे स्वातंत्र्य मिळेल अशा संघात खेळायचेय!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लखनऊ सुपर जायंट्सने (एलएसजी) संघाचा कर्णधार केएल राहुल याला मेगा लिलावापूर्वी रिलीज करण्याचा निर्णय घेतला, मात्र राहुल लखनऊ संघ सोडणार असल्याची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू होती. आयपीएल संघांची रिटेंशन यादी जाहीर झाल्यानंतर राहुलला लखनऊ संघाने रिटेन केले नव्हते. आता केएल राहुलने हा संघ सोडण्यावर पहिल्यांदाच वक्तव्य केले आहे.

केएल राहुलने भारताच्या टी-२० संघात परतण्याची इच्छा व्यक्त केली आणि लखनऊ सुपर जायंट्स संघ का सोडला हेदेखील सांगितले. राहुल हा एक उत्कृष्ट फलंदाज आहे, पण आजपर्यंत तो त्याच्या प्रतिभेचा पूर्ण क्षमतेने वापर करू शकला नाही.

स्टार स्पोर्ट्सवर बोलताना राहुल म्हणाला, मला नव्याने सुरुवात करायची होती, मला माझे पर्याय शोधायचे होते आणि मला अशा संघातून खेळायचे आहे जिथे मला खेळण्यासाठी थोडे स्वातंत्र्य मिळेल व संघातील वातावरणही चांगले मजेशीर असेल. काहीवेळा तुम्हाला फक्त पुढे जाऊन स्वतः साठी काहीतरी चांगले शोधण्याची गरज असते.

राहुलने टीम इंडियासाठी शेवटचा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना २०२२मध्ये इंग्लंडविरुद्ध खेळला होता. त्यानंतर त्याला टी-२० संघात संधी मिळालेली नाही. आता टीम इंडियात पुनरागमन करण्याबाबत राहुल म्हणाला की, मी भारतीय संघातून गेल्या काही काळापासून बाहेर आहे आणि मला माहितीय की, एक खेळाडू म्हणून मी कोणत्या वळणावर उभा आहे. पुनरागमनासाठी मला काय करायचे आहे याचा अंदाजही मला आहे. म्हणूनच मी येत्या आयपीएल सीझनची वाट पाहत आहे. आयपीएल जे मला पुनरागमनासाठी आणि माझ्या क्रिकेटचा आनंद घेण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. माझे ध्येय निश्चितपणे भारतीय टी-२० संघात पुनरागमन करण्याचे आहे.

**आरसीबी, पंजाब बोली लावणार?**

एलएसजीपासून वेगळे झाल्यानंतर केएल राहुल मेगा लिलावात सहभागी होणार आहे. या वेळी राहुल कोणत्या संघाचा भाग होणार याकडे चाहत्यांच्या नजरा खिळल्या आहेत. अनेक मीडिया रिपोर्ट्सनुसार रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज संघ राहुलवर बोली लावण्यासाठी उत्सुक आहेत.

# भारतीय संघ पाकिस्तानात येऊन खेळणार हे दिवसा स्वप्न पाहण्यासारखे

### माजी पाक क्रिकेटरचे वक्तव्य

**कराची : वृत्तसंस्था**

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धा १९ फेब्रुवारी ते ९ मार्च या कालावधीत नियोजित आहे, पण या स्पर्धेसाठी पाकिस्तानमध्ये जाण्यास टीम इंडिया राजी नाही. बीसीसीआयने या संदर्भात आयसीसीकडे आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. दरम्यान, या प्रकरणात पाकिस्तानचा माजी क्रिकेटर मोहम्मद हाफिझ याच्या सोशल मीडियावरील वक्तव्याने लक्ष वेधून घेतले आहे.

आशिया चषक स्पर्धेप्रमाणे या स्पर्धेचे आयोजन हायब्रिड मॉडेलसह व्हावे यासाठी भारतीय संघ प्रयत्नशील आहे. दुसरीकडे पाकिस्तान क्रिकेट बोर्ड यासाठी तयार नाही. या प्रकरणात आयसीसी सध्या वेट अ‍ॅण्ड वॉच भूमिकेत दिसते. त्यांनी आपली भूमिका अद्याप स्पष्ट केलेली नाही.

मोहम्मद हाफिझने एक्सवर लिहिलंय की, चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेत खेळण्यासाठी भारतीय संघ पाकिस्तानात येईल ही गोष्ट दिवसा स्वप्न पाहिल्यासारखी होती. पाकिस्तान ही स्पर्धा आयोजित करण्यासाठी सुरक्षित आहे.



सध्याच्या घडीला पाकिस्तानचा संघ अनेक संघांचा पाहुणचार करत आहे, पण भारतीय संघाला इथं असुरक्षित का वाटते माहिती नाही. आता पाकिस्तान सरकार आणि पीसीबीकडून कठोर आणि आश्चर्यचकित करून टाकणाऱ्या प्रतिक्रियेच्या प्रतीक्षेत आहे.

पाक क्रिकेटरने या पोस्टमधून टीम इंडियाला टोला मारलाच आहे, पण पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचेही कान टोचले आहेत, कारण गेल्या काही दिवसांपासून पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाकडून भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पाकमध्ये खेळेल, अशी चर्चा रंगताना पहायला मिळाली होती.

# अफगाणिस्तानच्या फलंदाजाची कमाल

### विराटला टाकले मागे, सचिनशी केली बरोबरी

**शारजा : वृत्तसंस्था**


अफगाणिस्तान विरुद्ध बांगलादेश यांच्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळली गेली, जी अफगाणिस्तान संघाने २-१ने जिंकली. अफगाणिस्तानने तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात चमकदार कामगिरी करत बांगलादेशचा आठ गडी राखून पराभव केला. या सामन्यात अफगाणिस्तानचा यष्टीरक्षक फलंदाज रहमानउल्ला गुरबाजने शानदार शतक झळकावले. या शतकासह गुरबाजने भारताचा महान फलंदाज विराट कोहलीला एका खास विक्रमात मागे टाकले. त्याचबरोबर त्याने सचिन तेंडुलकरचीही बरोबरी केली आहे.



गुरबाजच्या आठव्या एकदिवसीय शतकाने त्याला विराटला मागे टाकण्यास मदत केली, परंतु तो महान सचिन तेंडुलकरला मागे टाकू शकला नाही. गुरबाजने आठवे वनडे शतक झळकावण्यासाठी केवळ ४६ डाव घेतले. याशिवाय त्याने वयाच्या २२व्या वर्षी आठ वनडे शतके झळकावली आहेत. फक्त सचिन तेंडुलकर आणि दक्षिण आफ्रिकेच्या क्विंटन डी कॉकने इतक्या कमी वयात आठ शतके झळकावली होती. या वयात विराटच्या नावावर सात वनडे शतके आहेत. अशा परिस्थितीत तो आता या यादीत विराटच्या पुढे गेला आहे. याशिवाय गुरबाज सर्वात कमी एकदिवसीय डावात आठ शतके झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तिसऱ्या स्थानावर आहे.

तिसऱ्या सामन्याबद्दल बोलायचे झाल्यास बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. महमुदुल्लाहच्या ९८ आणि मेहदी हसन मिराझच्या ६६ धावांच्या जोरावर संघाने मर्यादित ५० षटकांत २४४ धावा केल्या. हा सामना जिंकण्यासाठी अफगाणिस्तानला २४५ धावांचे लक्ष्य देण्यात आले. त्यांनी ४८.२ षटकात केवळ पाच गडी गमावून २४६ धावा केल्या आणि सामना पाच विकेट्सने जिंकला.

# धोनीचं ठरलंय! चेन्नईच्या मैदानात खेळणार अखेरचा सामना



**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्सचे सीईओ काशी विश्वनाथन यांनी खेळाडूंना रिटेन-रिलीज करण्याआधीच महेंद्रसिंह धोनी आगामी हंगामातही संघाकडून खेळताना दिसेल याचे संकेत दिले होते. अनकॅप्ड प्लेअरच्या रूपात धोनीला संघात कायम ठेवत सीएसकेच्या संघाने लाखो चाहत्यांच्या मनासारखा निर्णय घेतला. आता फ्रँचायझी मालक आणि सीईओ विश्वनाथन यांनी धोनी कोणत्या मैदानात अखेरचा सामना खेळणार या संदर्भात मोठा खुलासा केला आहे.

आयपीएल स्पर्धा संपली की, धोनी थांबणार का? हा प्रश्न चर्चेत असल्याचे पहायला मिळाले आहे. २०२४च्या हंगामानंतरही ही चर्चा रंगली, पण सीएसके संघाने चार कोटी रुपयांमध्ये धोनीला संघासोबत कायम ठेवत त्याच्या आयपीएलमधील निवृत्तीच्या चर्चेला पूर्णविराम दिला. आता काशी विश्वनाथन यांनी धोनीच्या अखेरच्या सामन्यासंदर्भात भाष्य केले आहे.

महेंद्रसिंह धोनी हा आश्चर्यकारक निर्णय घेण्यात माहीर आहे. काशी विश्वनाथन यांनी त्याच्या याच स्वभावाचा दाखला देत तो शेवटचा सामना कुठे खेळणार हे ठरलंय असे सांगितले. ते म्हणाले की, धोनी आपल्या निर्णयासंदर्भात कधीच कुणाला काही कळू देत नाही, पण आयपीएलमधील शेवटचा सामना चेन्नईच्या मैदानात खेळण्याची त्याची इच्छा आहे.

जोपर्यंत त्याला खेळायचे आहे तोपर्यंत चेन्नई सुपर किंग्सचे दरवाजे त्याच्यासाठी खुले असतील. कधी थांबायचे या संदर्भात धोनी योग्य वेळी योग्य निर्णय घेईल, असा उल्लेखही त्यांनी सीएसकेच्या ताफ्यातील माजी खेळाडू अंबाती रायडूसोबत मुलाखतीमध्ये केला.

# अक्षर पटेल होणार दिल्लीचा नवा कर्णधार?



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आगामी इंडियन प्रीमियर लीगची चाहत्यांना आतुरता लागली असेल. याआधी मेगा लिलाव होणार आहे. मेगा लिलावापूर्वी दिल्ली कॅपिटल्सने एकूण चार खेळाडूंना कायम ठेवले आहे. त्यामध्ये अक्षर पटेल, ट्रिस्टन स्टब्स, अभिषेक पोरेल आणि कुलदीप यादव यांचा समावेश आहे. अशात एक मीडिया रिपोर्ट समोर आला आहे, ज्यामध्ये अक्षर पटेल दिल्लीचा कर्णधार होणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.

वृत्तानुसार आगामी हंगामात अक्षर पटेल दिल्ली कॅपिटल्सचे कर्णधारपद स्वीकारू शकतो. शेवटच्या हंगामात आरसीबीविरूद्धच्या सामन्यात अक्षरने पंतच्या जागी दिल्लीचे नेतृत्व केले होते. २०२५च्या मेगा लिलावापूर्वी दिल्लीने अक्षरला १६.५ कोटी रुपयांमध्ये कायम ठेवले आहे. दिल्लीने कायम ठेवलेला तो सर्वात महागडा खेळाडू आहे.

अक्षर पटेल हा २०१९पासून दिल्ली कॅपिटल्सकडून खेळत आहे. त्याने दिल्ली फ्रँचायझीचे प्रतिनिधित्व करताना एकूण ८२ सामने खेळले आहेत. त्यामध्ये त्याने ९६७ धावांसह ६२ विकेट्स घेतल्या. दिल्लीकडून खेळताना त्याने आयपीएलमध्ये सर्वाधिक यश मिळवले आहे. यापूर्वी त्याने ६८ सामन्यात ६८६ धावा करण्यासोबतच पंजाब किंग्जकडून खेळताना ६१ विकेट्स घेतल्या होत्या.

अक्षर पटेलच्या आयपीएल कारकिर्दीबद्दल बोलायचे झाले, तर त्याने आयपीएलच्या इतिहासात १५० सामने खेळले आहेत. त्यामध्ये त्याने २१.४७च्या सरासरीने फलंदाजी करताना १,६५३ धावा ठोकल्या आहेत. आयपीएलमध्ये त्याने तीन अर्धशतके झळकावली आहेत. सोबतच त्याने ७.२८च्या इकॉनॉमी रेटसह १२३ विकेट्स आपल्या नावावर केल्या आहेत. दरम्यान त्याचा स्ट्राईक रेट २५.२० राहिला आहे.

# मॅकस्विनीने घेतलाय बुमराहचा धसका

### गोलंदाजीचे व्हिडीओ पाहून जुळवून घेण्याचा प्रयत्न



**पर्थ : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर नॅथन मॅकस्विनी भारताविरुद्ध बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये पदार्पण करण्याची शक्यता आहे. मालिकेपूर्वी त्याने जसप्रीत बुमराहबाबत मत व्यक्त केले आहे.

उस्मान ख्वाजा आणि नॅथन मॅकस्विनी भारताविरुद्ध बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये ऑस्ट्रेलियाकडून सलामी देतील. नॅथन मॅकस्विनीला विश्वास आहे की तो भारतीय गोलंदाजीचा सामना करण्यास सक्षम असणार आहे, मात्र त्याच्यासमोर जसप्रीत बुमराहचे मोठे आव्हान असू शकते. मॅकस्विनी म्हणाला की पर्थमध्ये माझ्यासाठी आव्हान सोपे नसेल. मी जसप्रीत बुमराहचे व्हिडीओ सतत पाहतो, जेणेकरून मला मदत मिळू शकेल. सध्या व्हिडीओ पाहिल्यानंतर मी बुमराहच्या गोलंदाजीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करत आहे, पण नवीन गोलंदाजला खेळणे नेहमीच आव्हानात्मक असते.

जसप्रीत बुमराहच्या अनोख्या बॉलिंग अ‍ॅक्शनमुळे त्रास होऊ शकतो, असे नॅथन मॅकस्विनीचे मत आहे, पण त्यासाठी त्याची तयारी काय आहे? या प्रश्नाच्या उत्तरात मॅकस्वीनी म्हणाला की, मी माझ्या मूलभूत गोष्टींवर सतत काम करत आहे. एक सलामीवीर फलंदाज म्हणून मला माहीत आहे की मला चेंडू सोडण्याची कला अवगत आहे, जेणेकरून मी गोलंदाजाला माझ्याकडे वळवू शकेन.

# बॉर्डर-गावसकर मालिकेत पाच 'कांगारू' ठरू शकतात भारतासाठी डोकेदुखी

**सिडनी : वृत्तसंस्था**

भारताविरुद्ध पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यासाठी ऑस्ट्रेलियाने आपला संघ जाहीर केला आहे. या संघात असे अनेक खेळाडू आहेत, जे संपूर्ण मालिकेत भारतीय संघासाठी डोकेदुखी ठरू शकतात. त्यापैकी पाच खेळाडू तर दमदार कामगिरीने पाहुण्यांना अचडणीस आणू शकतात.



ऑफस्पिनर नॅथन लायन भारतासाठी सर्वात मोठा धोका ठरू शकतो. लायन हा तो ऑस्ट्रेलियन गोलंदाज आहे, ज्याने भारताविरुद्ध मायदेशात खेळल्या गेलेल्या कसोटी सामन्यांमध्ये सर्वाधिक विकेट्स घेतल्या आहेत. त्याने भारताविरुद्ध १५ कसोटी सामन्यांमध्ये ६० बळी घेतले आहेत. विशेष म्हणजे इतर कोणत्याही गोलंदाजाला ५० बळीही घेता आलेले नाहीत. अलीकडच्या काळात भारतीय फलंदाजांना फिरकीपटूंविरुद्ध झालेला त्रास पाहता लायन आणखी धोकादायक ठरू शकतो.

दिग्गज फलंदाज स्टीव्ह स्मिथ भारतासाठी सर्वात मोठी डोकेदुखी ठरू शकतो. रिकी पाँटिंगनंतर तो भारताविरुद्ध मायदेशात सर्वाधिक कसोटी धावा करणारा दुसरा ऑस्ट्रेलियन फलंदाज आहे. स्मिथने मायदेशातील भारताविरुद्धच्या आठ कसोटी सामन्यांमध्ये ८३.२३च्या सरासरीने १०८२ धावा केल्या आहेत. यात पाच शतके आणि चार अर्धशतकांचा समावेश आहे.

वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड आपल्या वेगाने भारतीय फलंदाजांना अडचणीत आणू शकतो. तो सातत्याने एका टप्प्यावर गोलंदाजी करू शकतो. मायदेशात त्याने भारताविरुद्धच्या ११ कसोटींमध्ये ४२ बळी घेतले आहेत. ऑस्ट्रेलियाच्या सक्रिय गोलंदाजांमध्ये तो सर्वाधिक विकेट घेणारा वेगवान गोलंदाज आहे. गेल्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात भारताला ३६ धावांत ऑलआऊट करण्यात हेझलवूडने महत्त्वाची भूमिका निभावली होती.

मार्नस लाबुशेनची फलंदाजीची शैली अगदी वेगळी आहे. जर तो एकदा क्रीझवर सेट झाला, तर त्याला बाद करणे खूप कठीण होते. लाबुशेन मोठ्या खेळी खेळण्यास सक्षम आहे. तो या ऑस्ट्रेलियन फलंदाजीचा पाया आहे. त्याने भारताविरुद्ध ऑस्ट्रेलियामध्ये पाच कसोटी सामन्यांच्या नऊ डावांत ५१.५५च्या सरासरीने ४६४ धावा केल्या आहेत.


सलामीवीर ट्रॅव्हिस हेड गेल्या एक-दोन वर्षांपासून जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. विशेषत: भारताविरुद्ध त्याचे आकडे आणखी धोकादायक आहेत. हेडने मायदेशात भारताविरुद्धच्या सहा कसोटी सामन्यांच्या १० डावांत केवळ २९९ धावा केल्या आहेत. यामध्ये त्याचा स्ट्राईक रेट ४२ होता, मात्र गेल्या वर्षापासून ऑस्ट्रेलियातील कसोटीत त्याचा स्ट्राइक रेट ८२पर्यंत वाढला आहे.

# मुलामुळे आम्ही अजूनही एक कुटुंब आहोत!

### घटस्फोटानंतर पहिल्यांदाच नताशाची हार्दिकबाबत प्रतिक्रिया

**मुंबई : प्रतिनिधी**

अभिनेत्री व मॉडेल नताशा स्टॅनकोविक क्रिकेटपटू हार्दिक पांड्यापासून विभक्त झाली. दोघांनी जुलै महिन्यात घटस्फोटाची घोषणा केली होती. आता एका मुलाखतीमध्ये या नात्याबाबत प्रतिक्रिया दिली आहे.



नताशा व हार्दिक या जोडप्याला मुलगा असून त्याचे नाव अगस्त्य आहे. नताशा मूळची सर्बियाची. ती मुलगा अगस्त्यसह सर्बियात असताना तिने घटस्फोटाची घोषणा केली होती. त्यामुळे अनेकांना वाटले की हार्दिकपासून घटस्फोट घेतल्यानंतर ती मुलाला घेऊन कायमची भारत सोडून सर्बियाला गेली, मात्र काही दिवसांनी नताशा भारतात परतली.

नताशाने हार्दिकपासून घटस्फोट घेतल्यानंतर कामाला प्राधान्य देत असल्याचे म्हटले आहे. नताशा आता कामावर परतली असून तिच्या आगामी प्रोजेक्ट्सच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे. एका मुलाखतीत नताशाने सांगितलं की ती व हार्दिक अगस्त्याचे सह-पालक आहेत. ती सर्बियाला काही दिवसांसाठी गेली होती, कायमची नाही. तिने भारत सोडून सर्बियामध्ये स्थायिक होण्याच्या सर्व अफवा फेटाळल्या आहेत.

नताशा म्हणाली, मी परत जाणार आहे, अशी चर्चा होती, पण मी परत कशी जाणार? माझा एक मुलगा आहे, तो इथे शाळेत जातो. त्यामुळे मी परत जाणे शक्यच नाही. मी परत जाणार नाही. माझ्या मुलाने इथे राहणे गरजेचे आहे, कारण तो इथला आहे. शेवटी त्याचे कुटुंब इथे आहे. आम्ही (हार्दिक आणि ती) अजूनही एक कुटुंब आहोत आणि मुलामुळे आम्ही कायम कुटुंबच राहू. मागील १० वर्षांपासून दरवर्षी काही दिवसांसाठी सर्बियाला जात असल्याचे नताशाने सांगितले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com